
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. : २०७५





# नाना पाटलांचे प्रतिसरकार



BVBK-0402075

बळवंत

– राजाभाऊ कुलकर्णी

वाचनालय वा.वा.

२०७५

१७।७।८८

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

माल [illegible]

क्र. क्र. २०७५ दिनांक १७।७।८८

विषय वा.वा. क्र. ..........

स्वातंत्र्य कथा माला : ५

# क्रांतिसिंह नाना पाटलांचे प्रतिसरकार

BVBK-0402075

राजाभाऊ कुलकर्णी

रचना समवाय प्रकाशन, पुणे

प्रकाशक :
गोपाळ मोकाशी
सचिव, रचना समवाय
द्वारा अक्षर भांडार
९६८ सदाशिव पेठ,
उंबऱ्या गणपती चौक, लक्ष्मी रस्ता
पुणे ४११ ०३०

●

प्रथमावृत्ति : १९८७

●


मुद्रक :
संजीव देशपांडे
अक्षरमुद्रा
१३६०, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२

●

© प्रकाशकाधीन

●

स्वातंत्र्य कथा माला : ५




म. सं. मं. ठाणे, ... शाखा.
माल ...
क्र. २०७५ दिनांक ७/७/८८
विषय पोवा क्र. ......

# मोर्चे आणि बलिदान

एकोणीसशे बेचाळीसच्या स्वातंत्र्य आंदोलनाला दि. ९ ऑगस्ट रोजी प्रारंभ झाला. मुंबईत भरलेले अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन दि. ८ ऑगस्टला–इंग्रज राजसत्तेला "चले जाव"चा आदेश देऊन समाप्त झाले. हे अधिवेशन अनेक दृष्टींनी अभूतपूर्व होते. महात्मा गांधींनी जनतेला उद्देशून उद्‌गार काढले की प्रत्येक भारतीय नागरिकाने स्वतःला स्वतंत्र समजून वागावे, ब्रिटिशांचे शासन जुमानू नये आणि 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढावे.

लढावे म्हणजे नेमके काय करावे ? लढ्यासाठी संघटना कशी निर्माण करावी ? या विषयी गांधींजींनी प्रत्यक्ष असे काही सांगितले नाही. मात्र त्यांना आम जनतेचा लढा अपेक्षित होता. जनतेने सामुदायिक उठाव करावा व ब्रिटिशांना देशावर राज्य करणे अशक्य करावे आणि स्वतःचे स्वयंशासन निर्माण करावे



 क्रांतिसिंह नाना पाटलांचे

असा त्यांनी दिलेल्या ' डू ऑर डाय ' म्हणजे ' करेंगे या मरेंगे ' या आदेशाचा अर्थ होता. लोकांना तो अर्थ बरोबर समजला. नऊ ऑगस्टचा सूर्यादय होण्यापूर्वीच सरकारने काँग्रेसच्या जेष्ठ नेत्यांवर झडप घातली. गांधीजींना पकडून त्यांनी अज्ञात स्थळी नेऊन ठेवले. काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांना अटक करून अहमदनगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध करण्यात आले. नऊ ऑगस्टला सकाळी, ज्या गोवालिया टँक मैदानावर काँग्रेसचे अधिवेशन भरले होते, त्या ठिकाणी अरुणा असफअल्ली यांनी शेकडो लोकांच्या साक्षीने झेंडावंदनाचा कार्यक्रम पार पाडला. ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध अखेरचा लढा सुरू झाल्याचे त्यांनी जाहीर केले आणि मैदानावर त्या जशा अचानक आल्या तशाच विजेच्या चपळाईने दिसेनाशा झाल्या. पोलिसांच्या हातावर त्यांनी तुरी दिल्या. त्या क्षणापासून त्यांचे भूमीगत जीवन सुरू झाले.

अच्युतराव पटवर्धन गोवालिया टँक मैदानावरच्या अधिवेशनास हजर होते. अधिवेशन संपल्यावर ते मुंबईतल्या आपल्या नेहमीच्या ठिकाणी गेलेच नाहीत. अटक करण्यासाठी पोलीस आपल्या मागावर असणार याची त्यांना खात्रीच होती. म्हणूनच घरी न जाता ते भूमिगत झाले आणि जनतेचा लढा संघटित करण्याच्या कामाला त्यांनी सुरूवात केली. महात्मा गांधींनी आंदोलनाची रुपरेखा स्पष्ट केली नसली आणि लोकांनी, स्वतःला स्वतंत्र झालो आहोत असे मानून वर्तन करावे असे सांगितले असले तरी काँग्रेस अंतर्गत काँग्रेस समाजवादी गटाने आंदोलन कसे असावे, कसे चालवावे व आंदोलनाचे नेमके उद्दिष्ट काय या विषयी बरेच दिवस अगोदर काळजीपूर्वक विचार चालविला होता. जयप्रकाश नारायण वैयक्तिक सत्याग्रह आणि नऊ ऑगस्टचे छोडो भारत

आंदोलन यांच्या दरम्यानच्या काळात देवळीच्या तुरुंगात बंदिवान होऊन पडले होते. त्या बंदिकाळातही त्यांच्या मनात भावी लढ्याच्या स्वरूपा विषयी विचारमंथन चालू होते. त्या संबधी त्यांनी काही टिपणे केली होती. त्यांच्या पत्नी श्रीमती प्रभावती कारागृहात त्यांची भेट घेण्यासाठी गेल्या असताना जयप्रकाशजींनी ती टिपणे त्यांच्याकरवी बाहेर पाठविण्याचा सावधपणाने प्रयत्न केला, पण त्यांचा तो प्रयत्न फसला. सुरक्षा अधिकाऱ्यांनी झडप घालून टिपणे हस्तगत केली. ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र लढा करण्याची आवश्यकता व तो कसा उभारता येईल या विषयी जयप्रकाशजींनी त्या टिपणींमध्ये काही विचार प्रकट केले होते व बाहेर असलेल्या आपल्या सहकाऱ्यांपर्यंत पोहोचते करण्याचा प्रभावती भेटीला आल्या असताना त्यांच्यामार्फत त्यांनी प्रयत्न केला होता.

तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी ती टिपणे हस्तगत केली आणि ब्रिटिश सरकारने त्याचे चांगलेच भांडवल केले. त्या टिपणीमध्ये व्यक्त केलेल्या विचारांबद्दल गांधीजींनी नापसंती दर्शवून निषेध प्रकट करावा अशी राज्यकर्त्यांची अपेक्षा होती. परंतु गांधीजींनी तसे काही केले नाही. उलट राज्यकर्त्यांनाच चार परखड बोल सुनावले व जयप्रकाशजींच्या राष्ट्रप्रेमाबद्दल आणि देश स्वतंत्र करण्याविषयीच्या त्यांच्या तळमळीबद्दल अभिमान प्रकट केला हे सूचक आहे. अखेरच्या स्वातंत्र्य लढ्याच्या स्वरूपाविषयी गांधीजींच्या मनात विचारांची आवर्तने कशी होत होती याबाबत काहीसा अंदाज त्यामुळे करता येतो. प्रत्येक भारतीय नागरिकाने स्वतःला स्वतंत्र समजावे व तसे समजून वागू लागावे असे त्यांनी आठ ऑगस्ट रोजी काँग्रेसच्या अधिवेशनात जे उद्गार काढले व डू ऑर

डाय, ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रत्यक्ष कृती करा किंवा मरणाला मिठी मारा असा आदेश दिला त्या आदेशाचे मर्महि ध्यानात येते. एकोणीसशे वीस आणि एकोणीसशे तीसच्या सत्याग्रही आंदोलनाच्या वेळी गांधींनी तसे निर्वाणीचे उद्गार काढले नव्हते व जनतेने सद्सद्विवेक बुद्धीनुसार लढा द्यावा असेही सुचविले नव्हते हे लक्षात घ्यावयास हवे.

काँग्रेसमधले, काँग्रेस समाजवादी गटाचे नेते अखेरचा स्वातंत्र्य लढा कशा पद्धतीने लढवावयाचा याचा विचार करीतच होते. तो विचार अहिंसात्मक सत्याग्रहाच्या वाटेने जात नव्हता. ब्रिटिशांची सत्ता देशातून उखडून कशी टाकावयाची या एकाच विचाराने ते नेते भारले होते. जयप्रकाश नारायणांनी तुरुंगातून बाहेर पाठविण्याचा प्रयत्न केलेली ती टिपणी म्हणजे त्या मंडळींच्या विचाराचा गाभा होता असे म्हटले तरी चालेल. पुढे कालांतराने अच्युतराव पटवर्धन प्रभृती काँग्रेस समाजवादी कार्यकर्त्यांनी बेचाळीसच्या स्वातंत्र्य लढ्याची जी आखणी केली आणि नऊ ऑगस्ट बेचाळीस रोजी भूमिगत होऊन अखेरच्या स्वातंत्र्य लढ्याचे रणशिंग फुंकले त्याची पार्श्वभूमी ही अशी होती. ब्रिटिशांची सत्ता जुमानावयाची नाही हे लढ्याचे मुख्य सूत्र होते. या लढ्याचे स्वरूप जगाच्या पाठीवरच्या अन्य परतंत्र राष्ट्रांमध्ये स्वातंत्र्यासाठी जे लढे झाले त्यांच्याहून अगदी वेगळे होते. या लढ्यासाठी शिस्तबद्ध सशस्त्र सेनादल नव्हते. सैन्यदलात जसे प्रमुख सेनापति व अधिकाऱ्यांची उतरंड असते तशी विविध स्तरांवरच्या अधिकाऱ्यांची उतरंड नव्हती. आम जनताच सैनिक बनली होती. त्या जनतेतूनच नेते निर्माण झाले.

स्वातंत्र्य सैनिकांचे गट ठायी ठायी निर्माण झाले आणि ब्रिटिश सत्ता झुगारून द्यावयाची म्हणजे काय करावयाचे याचा एक आराखडा त्या लोकनेत्यांनी तयार केला. मोठमोठ्या शहरात प्रथम उत्स्फूर्त मोर्चे निघाले. पोलिसांनी रोखलेल्या संगीनींना न जुमानता स्वातंत्र्याचा जयघोष करीत हजारो लोक त्या मोर्चात सामील झाले. रोखलेल्या बंदूकांना लोकांचे समुदाय भीक घालीत नाहीत असे पाहून बंदूका आग ओकू लागल्या. झाडावरची पाखरे बंदुकीच्या गोळ्या लागून पटापट खाली पडावीत तशी मोर्चातली माणसे मरून पडू लागली. नऊ ते तेरा ऑगस्टच्या दरम्यान असे प्रकार घडले. एक मोर्चा पोलिसांनी गोळीबार करून पांगविला की नव्या उमेदीने लोक दुसरा मोर्चा काढीत. दुसऱ्यानंतर तिसरा मोर्चा निघे, तिसऱ्यानंतर चौथा, असे मोर्चांचे सत्रच सुरू झाले.

जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी, जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय, मामलेदाराचे कार्यालय ही सत्तेची प्रतीके होती. मोर्चाने जाऊन त्या कार्यालयांचा ताबा घ्यावयाचा आणि ब्रिटिश सत्ता झुगारून दिल्याचे व देश स्वतंत्र झाल्याचे प्रतीक म्हणून जिल्हा कचेरीवर, तालुका कचेरीवर काँग्रेसचा झेंडा फडकवायचा असा उपक्रम लोकांनी उत्स्फूर्तपणे चालू केला. सातारा जिल्ह्यात हे कसे घडले हे पाहण्यासाठी थोडेसे मागे वळून सिंहावलोकन करावयास हवे. अखिल भारतीय काँग्रेसच्या मुंबईतल्या बैठकी-साठी सातारा जिल्ह्यातून वि. स. पागे, काशिनाथ देशमुख, वसंतराव पाटील, यशवंतराव चव्हाण, डॉ. भगवंतराव कुलकर्णी प्रभृती पंचवीस कार्यकर्ते गेले होते. नेहरू, पटेल, आझाद आदि प्रमुख-प्रमुख नेते व महात्मा गांधी यांना नऊ ऑगस्टची पहाट होण्यापूर्वीच सरकारने अटक केली होती. लोकांनीच पुढाकार

घेऊन दादरच्या शिवाजी पार्कवर दुसऱ्या दिवशी सभा घेतली. त्या सभेत सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी भाषण करून लढा कसा चालवावयाचा याबाबत मार्ग-दर्शन केले. त्याच दिवशी रात्री मुंबई पान बाजारात यशवंतराव चव्हाण यांचा मुक्काम होता. त्या ठिकाणी अधिवेशनासाठी आलेल्या जिल्ह्यातल्या निवडक कार्यकर्त्यांची बैठक झाली. सुमारे पंधरा कार्यकर्ते त्या बैठकीला उपस्थित होते. सातारा जिल्ह्यात आंदोलन कसे संघटित करावे याचा त्या बैठकीत खल झाला. गांधीजींनी करेंगे या मरेंगे असा आदेश दिलेला आहे. तो शिरो-धार्य मानून आपण चढाईचे धोरण स्वीकारावे, जिल्हा स्वतंत्र झाल्याचे जाहीर करावे व प्रतिस्पर्धी कारभार यंत्रणा निर्माण करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा द्यावा असे आग्रही प्रतिपादन त्या बैठकीत इस्लामपूर जवळच्या कामेरी गावचे चंद्रोजी पाटील ऊर्फ ' कारभारी ' यांनी केले.

एकोणीसशेसदतीस सालच्या निवडणुकीत चंद्रोजी पाटील मुंबई असेंब्लीवर निवडून आले होते. सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागात त्यांचे वजन होते. शेतकरी समाजात ते लोकप्रिय होते. त्यांच्या तोंडून बाहेर पडणारा शब्द बहुजन समाज झेलीत होता. यशवंतराव चव्हाणांनी मात्र घाई गर्दीने निर्णय न घेता कॉंग्रेस वरिष्ठांकडून आदेश येईल त्याप्रमाणे वागावे असे सुचविले. एवढी चर्चा झाल्यावर नेते मंडळी पांगली व वेगवेगळ्या मार्गाने साताऱ्या-कडे रवाना झाली. पुढे नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्ह्यात जे प्रतिसरकार निर्माण झाले त्या प्रतिसरकारच्या कल्पनेचा उगम आमदार चंद्रोजी पाटील ऊर्फ ' कारभारी ' यांनी नऊ ऑगस्टला मुंबईत भरलेल्या सातारा जिल्ह्यातल्या कार्य-

कर्त्यांच्या बैठकीत आग्रहाने प्रतिपादन केलेल्या विचारात आहे.

सातारा जिल्ह्यात नऊ ऑगस्टलाच भाऊसाहेब सोमण, शंकरराव साठे, जी. डी. ऊर्फ गणपतराव तपासे, गणपतराव आळतेकर आचार्य शं. द. जावडेकर, राघुअण्णा लिमये प्रभृती पहिल्या रांगेतले प्रमुख नेते सरकारने पकडले आणि त्यांना येरवड्याच्या तुरुंगात स्थानबद्ध करून ठेवले. मुंबईतल्या काँग्रेस अधिवेशनाला हजर राहून जिल्ह्यात परत आलेल्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची बैठक ऑगस्टच्या तेरा-चौदा तारखेला यशवंतराव चव्हाणांनी घेतली. त्या बैठकीत भूमिगत कार्यकर्त्यांची एक संघटना व दुसरी उघडपणे सभा मोर्चे काढून सत्याग्रह करणाऱ्यांची संघटना अशा दोन वेगवेगळ्या संघटना निर्माण करण्याचे ठरले. या दोन्ही संघटनांच्या कार्यात एकसूत्रीपणा ठेवण्यासाठी एक समितीही स्थापन करण्यात आली व सरकारी कचेऱ्यांवर मोर्चे नेऊन सत्याग्रह करण्याचे पर्व सुरू झाले. कऱ्हाडच्या मामलेदार कचेरी-वर पहिला मोर्चा गेला. तो पाच हजार लोकांचा होता. त्यामध्ये खुद्द कऱ्हाडचे तीन हजार व कऱ्हाड तालुक्यातल्या वीस गावातून आलेले दोन हजार लोक होते. ती तारीख होती ऑगस्ट चोवीस.

बाळकोबा पाटील उंडाळकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा कऱ्हाडच्या मामलेदार कचेरीवर गेला. मोर्चा शांततेने काढण्यात आला होता. मामलेदार कचेरीला हत्यारबंद पोलिसांनी कडे घातले होते. पोलिसांनी अडविताच मोर्चातले लोक शांतपणे खाली बसले. मोर्चाचे नेते बाळकोबा पाटील यांनी जमावापुढे भाषण करून सत्याग्रह केला. पोलिसांनी त्यांना अटक केली. त्याच दिवशी पाटण तालुक्याच्या मामलेदार कचेरीवरही दोन हजार लोकांचा मोर्चा गेला होता. मोर्चाच्या नेत्यांनी काँग्रेसचा झेंडा मामलेदार

कचेरीवर फडकवला. सप्टेंबरच्या तीन तारखेला तासगावच्या मामलेदार कचेरीवर असाच एक भव्य मोर्चा गेला होता. या मोर्चाची तयारी गावोगावी हिंडून नाना पाटील आदि कार्यकर्त्यांनी केली होती. तालुक्याच्या वीस गावातून आलेले सुमारे पाच हजार सामान्य शेतकरी मोर्च्यात होते. त्यांना तासगाव शहरातले तीन हजार नागरिक मिळाले व आठ हजार लोकांचा भव्य मोर्चा घोषणा देत मामलेदार कचेरीकडे चालू लागला. तेथे जाण्या-अगोदर मोर्चा मुनसफ कोर्टावर गेला. मुनसफ आपल्या कार्यालयातून बाहेर आले व त्यांनी मोर्चाचे स्वागत केले. मोर्चातल्या लोकांनी आग्रह धरला की मुनसफांनी मोर्चाच्या नेत्यांना हार घातला पाहिजे. मुनसफ साहेबांनी त्या आग्रहापुढे मान तुकविली व कोर्टाला एक दिवसाची सुट्टी जाहीर केली. या विजयाने मोर्चातील लोकांचा हुरुप वाढला व मोर्चा मामलेदार कचेरीवर गेला. कचेरी जवळ शंभर हत्यारी पोलिसांनी मोर्चा अडविला. तेव्हा मोर्चाच्या नेत्यांनी महात्मा गांधींच्या जयघोषात मामलेदारांच्या डोक्यावर गांधी टोपी घातली आणि त्यांच्या कचेरीवर काँग्रेसचा तिरंगी झेंडा लावला.

तासगावच्या मामलेदार कचेरीवर दुसरा मोर्चा सप्टेंबरच्या नऊ तारखेला गेला. तोपर्यंत सरकारचा निर्णय झाला असावा. मोर्चा शांततापूर्ण असला तरी, तो चालू द्यावयाचा नाही असे वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी ठरविले.

त्याचे प्रत्यंतर नऊ सप्टेंबरच्या वडूज येथील मोर्चाच्या वेळी आले. या मोर्चाची तयारी गौरिहर सिंहासने प्रभृती कार्यकर्त्यांनी तालुकाभर प्रयत्न करून केली होती. सातशे लोकांचा हा मोर्चा वडूजच्या मामलेदार कचेरीपासून काही अंतरावर पोलिसांनी


अडविला व पुढे याल तर गोळ्या घालू अशी धमकी दिली. मोर्चाच्या नेत्यांनी, आम्ही सत्याग्रही आहोत व शांततेने निदर्शन करून सभा घेणार आहोत असे पोलीस अधिकाऱ्यांना सांगितले व तेथेच बैठक मारली. मोर्चा मागे हटत नाही असे पाहिल्यावर तेथे हजर असलेल्या मामलेदारांनी गोळीबार करण्याचा हुकूम दिला. सुमारे पावणे दोनशे गोळ्या झाडण्यात आल्या. रस्त्यावर रक्ताचा सडा शिंपडला गेला. मोर्चाच्या नेत्यांसह, जागचे जागीच पांच लोक ठार झाले. पंचाहत्तर जखमी झाले. त्यांच्यापैकी पुढे इस्पि-तळात तिघेजण मरण पावले. या घटनेनंतर शांततामय मार्गाने सत्याग्रही लढा चालविण्याच्या कल्पनेची जवळजवळ इतिश्री झाली व नेते लढ्याचा अन्य मार्गाचा विचार करू लागले.

पांडू मास्तर वगैरे नेते सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागात गावोगावी दौरे काढून प्रचार सभा घेतच होते. बंदी हुकूम व पोलिसांचा पाठलाग याची पर्वा न करता त्यांनी लढ्याच्या प्रचाराचा धुमधडाका उडवून दिला होता. निपाणीच्या मल्लि-कार्जून डोंगरावर कार्यकर्त्यांची सभा झाली. एक हजार सशस्त्र भूमिगत कार्यकर्ते सभेला उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण त्या सभेला आले होते. इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर सप्टेंबरच्या दहा तारखेला मोर्चा नेण्याचे त्या बैठकीत ठरले. तालुक्याच्या दोन्ही भागातून सुमारे पाच हजार लोक मोर्चासाठी आले होते. कामेरी भागातून आलेले कार्यकर्ते आणि किर्लोस्करवाडी वगैरे भागातून आलेले कार्यकर्ते असे मोर्चाचे दोन भाग होते. कामेरी भागातून आलेला मोर्चा इस्लामपुरात अगोदर येऊन दाखल झाला. पहिल्या मोर्चाचे नेते पांडू मास्तर यांनी गांधी चौकात सभा घेतली तेव्हा पोलीस सभेवर तुटून पडले व त्यांनी पांडू मास्तरांना पकडले.

किर्लोस्करवाडी भागातून दुसरा मोर्चा तोवर तेथे येऊन थडकला होता. पांडू मास्तर प्रभृतींना अटक झाल्याचे कळताच मोर्चातले लोक खवळलें व मोर्चा सरळ मामलेदार कचेरीकडे निघाला. मोर्चाचे पुढारी विनायकराव थोरात व पांडुरंग गोटखिडींकर यांना मामलेदार कचेरीपासून दोनशे यार्डांवर पोलिसांनी अडविले.

मोर्चाच्या आघाडीवर किर्लोस्करवाडीच्या कारखान्यातले एक तरुण इंजिनिअर उमाशंकर पंड्या होता. इतरांच्यापेक्षा काहीसा वेगळा दिसणारा हा सुशिक्षित माणूस पाहून मुख्य पोलीस अधिकाऱ्याने तू यात कसा ? तुला काय हवे आहे ? असे पंड्यांना विचारले तेव्हा तो निधडच्या छातीचा तरुण उद्‌गारला, 'स्वराज्य'! ते उत्तर ऐकून येटस् नावाचा तो अधिकारी चवताळला व हातातले पिस्तुल झाडून त्याने पंड्यांना यमसदनाला पाठविले ! लगेचच चौफेर गोळीबाराला सुरूवात झाली. विष्णू बारबटे या नावाचा कार्यकर्ता जागच्या जागी ठार झाला. सतरा कार्यकर्ते जखमी झाले. प्रथम वडूज व नंतर इस्लामपूर मोर्चामध्ये पोलीसांनी केलेले हत्याकांड पाहून चळवळीच्या नेत्यांचा पूर्ण भ्रमनिरास झाला व सातारा जिल्हा सत्याग्रही तंत्रापासून दूर जाऊन त्याने हातात उघड उघड शस्त्र घेतले. काही नेते अगोदरच भूमिगत झाले होते. आता भूमिगतांच्या संख्येत फार मोठी भर पडली व प्रतिसरकारच्या स्थापनेच्या दिशेने वाटचाल चालू झाली.

म. ग्रं. सं. ... शाखा.
दा. क्र. २०७५ ... ११/७/८८
विषय ...



# प्रतिसरकार व तुफान सेना

दरम्यानच्या काळांत देशभर लढा चालविण्यासाठी मुंबईला मध्यवर्ती संघटना स्थापन झाली होती. त्या संघटनेचे नेतृत्व अच्युतराव पटवर्धन यांच्याकडे होते. मध्यवर्ती समितीमध्ये अच्युतराव पटवर्धन, कर्नाटकाचे रंगराव दिवाकर, डॉ. राम मनोहर लोहिया, सुचेता कृपलानी आदि प्रमुख नेते होते. लढयाच्या सुसूत्रीकरणासाठी महाराष्ट्राचे दोन भाग पाडण्यात आले होते. दक्षिणेकडचे पुणे सातारा आदि सहा जिल्ह्यांसाठी शिरूभाऊ लिमये यांची नियुक्ती झाली होती व उत्तरेकडच्या सहा जिल्हयांच्या कामाला एस् एम् जोशी यांनी मुंबईत राहून मार्गदर्शन करावे असा निर्णय करण्यात आला होता. या समितीने सातारा जिल्ह्याची जबाबदारी श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यावर सोपविली होती. दळणवळणाची साधने नष्ट करणे, रेल्वे मार्ग बंद पाडणे, टेलिग्राफ

व टेलिफोनच्या तारा तोडून सरकारची संपर्क साधने नाहीशी करणें असा प्रारंभीचा कार्यक्रम होता.

मानवी हत्या टाळून ती कामे करावयाची असा संकेत मध्यवर्ती समितीने घालून दिला होता. युद्ध प्रयत्नांत अडथळे आणून सरकारला हैराण करून हतबल करून सोडावयाचे व त्यातूनच जनतेचे प्रतिस्पर्धी शासन निर्माण करावयाचे अशी कल्पना होती. या कल्पनेला अनुसरून महाराष्ट्रात जोमाने कामाला सुरुवात झाली.

पुणे-मुंबई मार्गावर खंडाळ्याच्या घाटांत, निर्मनुष्य जंगलामध्ये वीज पुरवठ्याच्या तारा वाहून नेणारे पायलॉन्स म्हणजे विजेचे काही खांब भूमिगत कार्यकर्त्यांनी एका काळोख्या रात्री कापून टाकले. पुण्यापासून मुंबई पर्यंतचा परिसर व मुंबई शहर कित्येक तास काळोखात बुडालें. युद्धसाहित्याची निर्मिती करणारे कारखाने ठप्प झाले. तो प्रकार पाहून वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. त्यांना चांगलाच धक्का बसला. त्या मार्गावर हत्यारी पोलिसांची पथके अंतराअंतरावर ठेवलेली असतानाहि हे प्रकार घडत असल्याचे पाहून सरकार चवताळून गेलें. खडकी-देहूरोडच्या लष्करी डेपोतल्या दारूगोळ्याला व बाँबगोळ्यांना, हँडग्रेनेडसना पाय फुटत होते व ते आपली सैनिकांच्या बंदोबस्ता-तली जागा सोडून भूमिगतांच्या भांडारात येऊन दाखल होत होते. गोव्याची आणि हैद्राबाद संस्थानची सरहद्द ओलांडून पिस्तुले काडतुसे महाराष्ट्रांत येत होती. तरूण विद्यार्थी कार्यकर्ते शाळा कॉलेजांना रामराम ठोकून हत्यारे, दारूगोळा इकडून तिकडे वाहून नेण्याचे काम करीत होते. शास्त्र शाखेचे पदवीधर तरूण

स्फोटकांचे विविध प्रयोग करून नवीन नवीन अफलातून हत्यारे निर्माण करीत होते.

पुणे–मिरज रेल्वे मार्गावर क्रांतिकारकांचा डोळा होता. लष्करी साहित्याने भरलेल्या मालगाड्या त्या रेल्वे मार्गावरून सतत धावत होत्या. रेल्वे मार्ग उध्वस्त करून लष्करी हालचाल खंडित करण्याचा उपक्रम म्हणूनच भूमिगतांनी हाती घेतला. कराड ते बिचूदच्या दरम्यान लष्करी साहित्य वाहून नेणारी एक मालगाडी पाडण्याचा प्रयत्न झाला. रुळ उखडून टाकण्यात आले होते. पहाटेच्या वेळी किर्र काळोखात एक मालगाडी धडधडत आली आणि बिचूद–ताकारी स्टेशनांच्या दरम्यान उलथून पडली. खोबरेल तेलाने भरलेल्या वाघिणी फुटल्या आणि तेलाच्या प्रवाहाचा ओढा बनून वाहू लागला ! एक दिवस कऱ्हाड जवळचे शिरवडे स्टेशन भूमिगतांनी हल्ला चढवून जाळून टाकले. त्या घटनेच्या पाठोपाठ रेल्वे स्टेशने जाळून टाकण्याचे सत्रच सुरु झाले.


मुंबईतून जे मध्यवर्ती मंडळ आंदोलनाचे मार्गदर्शन व नियंत्रण करीत होते त्या मंडळाने सातारा जिल्ह्याची जबाबदारी यशवंतराव चव्हाण यांच्यावर सोपविली होती. सुरूवातीचे काही दिवस सातारा जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांनी व भूमिगतांनी मध्यवर्ती मंडळाचा हा निर्णय मान्य केला. औंध संस्थानच्या आश्रयाने राहून भूमिगतांचा एक गट कार्य करीत होता. कुंडल ग्रुप या नावाने हा गट ओळखला जात होता. त्या गटाचे नेतृत्व नाना पाटलांच्याकडे होते. नाथा लाड, जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी आदि निधड्या छातीचे व सळसळत्या रक्ताचे कार्यकर्ते कुंडल ग्रुपमध्ये होते. घातपाती कृत्ये करून युद्ध प्रयत्नांत अडथळे निर्माण करत रहावयाचे, ब्रिटिश सरकारला हैराण करण्यावरच

समाधान मानावयाचे की, त्यापुढे पाऊल टाकून खेडी आणि गावे स्वतंत्र करून प्रतिसरकार स्थापन करावयाचे, प्रतिसरकारचा कारभार–कारभार यंत्रणा निर्माण करून प्रत्यक्ष चालू करावयाचा, या प्रश्नावर कुंडल ग्रुप आणि कऱ्हाड भागातले यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे कार्यकर्ते यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. जसजशी दिवसगत होत चालली तसतसा या दोन गटांमधील दुरावा वाढत गेला. कुंडल गटाने यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व जवळजवळ झुगारून दिले. सेंट्रल डायरेक्टोरेटसाठी सातारा जिल्ह्याचे नेतृत्व यशवंतराव चव्हाणांच्याकडे नाममात्र राहिले. प्रत्यक्षात ते नाना पाटील व त्यांचे निधडचा छातीचे कार्यकर्ते यांच्याकडे गेले. कुंडल गटाचे विचार अधिक स्पष्ट होते. विकेंद्रित लोकशाहीचे विचार प्रत्यक्षात उतरविण्याची त्यांची योजना होती. त्यांनी लोक न्यायालये स्थापन केली व त्या भागातले जमीन-विषयक तंटे, खाजगी अदावतीतून निर्माण झालेले तंटे, साव-कारांची जुलूम जबरदस्ती व शेतकऱ्यांची लुबाडणूक वगैरे संबंधीचे खटले लोक न्यायालयीकरवी निकाली काढण्यास सुरुवात केली. त्या भागात दिवसा उजेडी ब्रिटिश सरकारचा अंमल होता आणि दिवस मावळून रात्र सुरु झाली की प्रतिसरकारचा अंमल सुरु होत होता.

भूमिगतांच्या कुंडल गटाला निसर्गत:च काही अनुकूलता लाभली होती. औंध संस्थानची हद्द अगदी हाकेच्या अंतरावर होती. औंधच्या पंत प्रतिनिधींना आंदोलनाविषयी सहानुभूती होती. राजा मोठा उमदा, विचारी, दूरदर्शी आणि स्वातंत्र्यप्रेमी होता. त्यांचे चिरंजीव बॅ अप्पासाहेब पंत संस्थानचे पंतप्रधान होते. महात्मा गांधींच्या सहवासात ते आले होते व गांधीजींच्या
...२

विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. महात्माजींच्या प्रेरणेने त्यांनी औंध संस्थानात लोकशाहीचा अभिनव प्रयोग केला व सत्ता लोक-प्रतिनिधींच्या स्वाधीन केली. अप्पासाहेब पंतांनी भूमिगत नेत्यांच्या बरोबर प्रत्यक्ष संबंध जोडले. राजेसाहेबांनी त्यांना मुळीच प्रति-बंध केला नाही. मात्र जे काही करावयाचे ते सावधगिरीने करावे व जबाबदारी ओळखून वागावे असा सल्ला त्यांनी अप्पासाहेब पंतांना दिला होता. औंध संस्थानचा कुंडल गटाला मोठा आधार होता. ब्रिटिशांनी फरारी म्हणून जाहीर केलेले व अटकेसाठी रोख रक्कमेची बक्षिसे देण्याची आमिषें निर्माण केलेले नेते औंध संस्थानच्या हद्दीमध्ये उघडपणाने वावरत होते. पुढे पुढे प्रति-सरकारचा दबदबा जसा वाढू लागला, तसे ब्रिटिश हद्दीतील खेडोपाडीचे लोकही भूमिगतांना आश्रय देऊन सहाय्य करण्यासाठी स्वतः होऊन पुढे येऊ लागले. पोलिसांनी गावा गावावर छापे घालावेत, परंतु गावात असूनही भूमिगत कार्यकर्ते त्यांच्या हाती लागू नयेत असे घडू लागले.

नाना पाटील साताऱ्याच्या प्रतिसरकारचे नेते होते. स्फूर्ती-स्थानही होते. तथापि परिस्थितीने व काहीशा वैयक्तिक ईर्षेनेही भूमिगत कार्यकर्त्यांचे वेगवेगळे गट निर्माण झाले. हे गट म्हटले तर स्वतंत्र होते. म्हटले तर ढिसूळ स्वरूपाच्या एका सूत्रात ओवले गेले होते. एकोणीसशे त्रेचाळीसच्या सुमारास परिस्थितीच अशी निर्माण झाली की जिल्हाभर व क्वचित सातारा जिल्ह्याच्या बाहेर संचार करणारे नाना पाटील कुंडल व आसपासच्या परिसरातच राहू लागले. तेथे त्यांच्या भोवती जमा झालेला कार्यकर्त्यांचा गट कुंडल गट म्हणून ओळखला जाऊ लागला. प्रामुख्याने या कुंडल गटानेच प्रतिसरकारची स्थापना केली. निधडच्या छातीच्या



दरोडेखोराचा नि:पात

तरुणांची शिस्तबद्ध तुफान सेना निर्माण केली. गुन्हेगार-फरारी गुंडांच्या टोळयांचा कठोरपणाने व अगदी निर्घृणपणे बंदोबस्त केला. काही गुंडांना यमसदनाला पाठविले व प्रतिसरकारच्या कारभाराचा मार्ग सुकर केला. या प्रत्येक गटासाठी एक डिक्टेटर असे. कुंडल गटाचे डिक्टेटर खुद्द नाना पाटील होते. त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी, नाथा लाड प्रभृतींचा समावेश होता.

वाई तालुक्यात किसन वीर गट काम करीत होता. आश्चर्याची गोष्ट म्हणज सांगलीच्या वसंतराव दादा पाटलांचा अंतर्भाव

किसन वीर डिक्टेटर असलेल्या वाईच्या या किसन वीर गटात होता व काम मात्र ते सांगली संस्थान व आसपासच्या भागात करीत होते.

बर्डे मास्तर गटाचे कार्यक्षेत्र वाळवा तालुका व शिराळापेटा होते. या गटात पांडू मास्तर, शेख काका आदि कार्यकर्ते होते.

बिळाशी भागात बाबूराव चरणकरांचा गट कार्य करीत होता.

हे गट आपापल्या भागात जवळ जवळ स्वतंत्रपणे कार्य करीत असले तरी प्रतिसरकारच्या स्थापनेबाबत त्या सर्व गटांचे एकमत होते व आपापल्या भागात प्रतिसरकारचे प्रतिनिधी म्हणूनच ते



गांधी–लग्न

गट कार्य करीत होते. सावकारशाही नष्ट करणे, शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करणे, ब्रिटिश सरकारचे हस्तक म्हणून वावरणाऱ्यांच्या, पायांना पत्री मारण्याच्या रूपाने शासन करणे, न्यायदान मंडळे स्थापन करून पंचांमार्फत न्यायदान करणे, सामाजिक सुधारणा घडवून आणून बिन खर्चाची "गांधी–लग्ने" लावणे वगैरे स्वरूपाची कामे हे गट आपापल्या क्षेत्रात करीत असत. अच्युतराव पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली मुंबईला कार्य करणाऱ्या सेंट्रल डायरेक्टोरेट म्हणजे लढ्याचे मार्गदर्शन व नियंत्रण करीत असलेल्या मध्यवर्ती समितीबरोबर गटांचे डिक्टेटर म्हणजे मुख्य नेते संबंध ठेवीत. त्यांचा सल्ला घेत व त्या सल्ल्यानुसार स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन कार्य करीत.

ग्राम राज्याचा कारभार, लोक न्यायालयाचे कार्य आणि तुफान सेनेचे काम व संघटना अगदी पद्धतशीरपणे चालू होत्या. तुफान सेनेतल्या सैनिकांचा आकडा पाच हजारांपर्यंत गेला होता. ती सेना शिस्तबद्ध होती. सेनेची शिस्त कडक होती व त्या शिस्तीची अंमल बजावणीही काटेकोरपणे केली जात होती.

हे तुफान सैनिक ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळी, सूचना मिळताच दहा मिनिटांच्या आत हजर होत असत. थोडे थोडके नव्हेत तर अडीच हजारांच्या संख्येने. गावात शांतता राखण्याची जबाबदारी त्या त्या गावातल्या तुफान सेनेच्या संघटनेवर असे. मात्र गावातल्या गुन्हेगारांना व ब्रिटिशांच्या हस्तकांना तुफान सैनिकाने शारिरीक शिक्षा करावयाची नाही; त्याने फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांना वर्दी द्यावयाची असा नियम होता. चौकशी करून शिक्षा सुनावणीचे काम करण्यासाठी वेगळी यंत्रणा निर्माण केली होती. तुफान सैनिकांमधून योग्य व लायक माणसांचा विचार

करून त्यांनाच बंदुका चालविण्याचे शिक्षण देण्यात येत असे. त्यासाठी कुंडलला एक 'व्यायामशाळा' स्थापन करण्यात आली. त्या शाळेने लष्करी शिक्षण देऊन तुफान सेनेसाठी दोनशे पन्नास 'कॅप्टन' तयार केले. प्रत्येक कॅप्टनच्या हाताखाली पंचवीस ते पन्नास तुफान सैनिक असत. तुफान सेनेच्या निर्मितीची कल्पना कुंडल-ग्रुपचे एक नेते व नाना पाटील यांचे सहकारी अप्पासाहेब लाड यांची होती. अप्पासाहेब लाड व जी. डी. लाड हेच तुफान सेनेचे सर्व श्रेष्ठ अधिकारी होते. तुफान सेनेच्या कॅप्टनला गुप्त माहिती मिळविणे, लोक न्यायालयांच्या निकालाची अंमलबजावणी करणे, बहिष्कारापासून प्रत्यक्ष शारिरीक शिक्षेची अमल बजावणी करण्याची तजवीज व व्यवस्था करणे वगैरे कामे करावी लागत. कॅप्टन जवळ एक डायरीवजा नोंद वही असे. त्या वहीत त्याला गावातल्या गुंडांच्या हालचाली, सरकारच्या खबऱ्यांचे उद्योग, गाव पंचायतींनी दिलेल्या निवाड्याचे तपशील, इत्यादि बाबतच्या नोंदी ठेवाव्या लागत. ही डायरी आठवड्यातून एकदा त्याला तुफान सेनेच्या वरिष्ठांच्याकडे सादर करावी लागे. ज्या गावात ग्रामराज्याचा कारभार सुरू करावयाचा त्या गावात प्रथम किमान पंचवीस तुफान सैनिक कॅप्टनने निर्माण केले पाहिजेत असा दंडक होता. कॅप्टनच्या सोईसाठी बारा गावांचा एक गट तयार करण्यात येई. नव्याने भरती होणाऱ्या तुफान सैनिकांच्या राजकीय शिक्षणासाठी गटवार बौद्धिकांचे वर्ग घेण्यात येत व त्यांना राजकीय व लष्करी शिक्षण पद्धतशीरपणे देण्यात येत असे.

साताऱ्याचे प्रतिसरकार काही एकदम आकाशातून जमिनीवर अवतरले नाही. नेत्यांच्या विचार मंथनातून त्याची निर्मिती झाली होती. जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागात जे गट कार्य करीत होते त्या

गटांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक वीस मार्च एकोणीसशे चव्वेचाळीस रोजी शिराळा पेट्यातील मिरूरव्याची वाडी येथे रात्री झाली. नव्वद भूमिगत नेत्यांना बैठकीसाठी आमंत्रणे पाठविली होती व ते सारेजण उपस्थित राहिले होते. बैठकीत किसन वीर यांना डिक्टेटर निवडण्यात आले. त्यांच्या दिमतीला अकरा सदस्यांचे कार्यकारी मंडळ देण्यात आले. त्या मंडळाचे सदस्य म्हणून कऱ्हाडचे कासेगांवकर वैद्य ऊर्फ धन्वंतरी, किसन वीर, बाबुजी पाटणकर, अंतुकाका बर्डे, बुवा म्हावशीकर, शेख काका, नागनाथ नायकवडी, नाथाजी लाड प्रभृती अकरा जणांची नियुक्ती झाली. त्याच वेळी तीन सुपरवायझर्स-म्हणजे निरीक्षक नेमण्यात आले. जिल्ह्याच्या पश्चिम भागासाठी पांडू मास्तर, पूर्व भागासाठी जी. डी. लाड व उत्तर भागासाठी पांडूतात्या बोराटे यांची सुपरवायझर म्हणून नियुक्ती झाली. कामाच्या सोईसाठी जिह्याचे वीस भाग पाडण्यात आले. जिल्ह्यात एकशे दहा प्रमुख भूमिगत नेते होते. प्रत्येक विभागासाठी एक नायक व एक उपनायक नेमण्यात आला व त्यांच्या मदतीसाठी तीस सदस्यांची नेमणूक करण्यात आली. या बैठकीत ठरलेल्या धोरणानुसार प्रयेक गावात सेवादल, वाचनालय आणि न्यायदान मंडळ स्थापन झाले.

न्यायमंडळाचे काम अतिशय पद्धतशीरपणे चालत होते. सुरुवातीला न्यायमंडळाचे काम तोंडीच चालत असे. जवळ जवळ ऐंशी टक्के खटल्यांचे निकाल तडजोडीने होत. पुढे पुढे न्यायमंडळाची लोकप्रियता वाढली व कामही वाढले. लोक ब्रिटिश सरकारच्या कोर्टात खटले घेऊन जाण्या ऐवजी या न्यायपंचायतींकडेच तक्रारी घेऊन येऊ लागले. कामाचा व्याप वाढू लागला. मग लेखी स्वरूपात कामकाजासाठी नियम करण्यात आले. शंभर रुपयांपर्यंतच्या

दिवाणी दाव्यात सर्व पंचांचा कौल घेऊन निकाल कायम करण्यात यात्रा, त्यावर अपील करता येणार नाही असा नियम होता. शंभर रुपये रक्कमेच्यावरील दाव्यात एकूण तीन. अपीलांची सवलत ठेवली होती. फौजदारी स्वरूपाच्या खटल्यातही तीन अपीले करण्याची तरतूद होती. अपीले चालविणाऱ्या वरिष्ठ न्यायसभेत अनुभवी कायदेतज्ञ असत. अगोदर दिवस मुक्रर करून गावातल्या सर्व लोकांना जमवून पाच, सात व नऊ पंच निवडले जात. पंचांच्या निवडीत एकमत झाले नाही तर त्यांची निवड बहुमताने केली जात असे. पंचांच्या निवडीमध्ये सेवादलाचा एक कॅप्टन बहुदा असे. न्यायमंडळाकडे येणाऱ्या तक्रारीत जमिनीच्या बांधाची रेटारेटी, जमिनीची मालकी, सावकाराने कर्जापोटी करून घेतलेले जमिनीचे कागद, चोऱ्या, मारामाऱ्या, वहिवाटीचे हक्क, दत्तक प्रकरणे, व्यभिचार इत्यादि तक्रारी असत. न्यायदानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्यासाठी भूमिगतांचे एक स्वतंत्र मंडळ निर्माण करण्यात आले होते. निकालाची अंमलबजावणी झाली नाही तर सामुदायिक बहिष्कार घालण्याची पद्धत अवलंबिली जात होती.

प्रतिसरकारची शासन यंत्रणा सातारा जिल्ह्यात सुमारे चौदा महिने परिणामकारकपणे काम करीत होती. ब्रिटिशांनी सत्तात्याग करावयाचा निर्णय घेतल्यावर स्वातंत्र्याचा अरुणोदय होऊ लागला तेव्हाच प्रतिसरकारच्या कार्याला पूर्णविराम देण्यात आला. या चौदा महिन्यांच्या काळात खानापूर, कराड, वाळवे व तासगाव तालुक्यात लोकन्यायालयांपुढे पाच हजार सातशे विविध स्वरूपाचे खटले चालले व ते निकाली काढण्यात येऊन त्या निकालांची अंमलबजावणी करण्यात आली. खालचे कोर्ट, त्यावरचे कोर्ट व सर्वश्रेष्ठ कोर्ट अशी अपीले होऊन शेकडो खटले निकाली काढण्यात

आले. खटल्यांच्या सुनावणीची पद्धत घालून देण्यात आली होती. नियमांचे काटेकोर पालन करण्यात येत होते. ब्रिटिश हद्दीत ज्या पद्धतीने न्यायदानाचे नियमबद्ध काम चाले, तसेच नियमबद्ध काम या लोकन्यायालयांचे चाले. मात्र एक मोठा फरक होता. या लोक-न्यायालयांना जनतेचे सँक्शन होते. न्यायनिवाडा करण्याच्या कामी जनतेमधून निवडलेले प्रतिनिधी न्याय मंडळाचे पंच म्हणून काम करीत व आपले मत ते निर्भीडपणाने व्यक्त करीत. प्रति-सरकारच्या राजवटीत जनतेला न्याय सुलभ, स्वस्त आणि काटेकोर मिळू लागला. पाचामुखी परमेश्वर हे सूत्र न्याय मंडळाने स्वीकारले होते. त्यामुळे प्रतिसरकारच्या न्यायदानपद्धतीत पंचांच्या मतांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. न्याय निःपक्षपाती होऊ लागला. प्रतिसरकारचा प्रभाव ज्या भागात होता त्या भागातली ब्रिटिश तालुका न्यायालये ओस पडली होती व कोर्टात कामच नाही म्हणून न्यायाधीशांना माशा मारीत वेळ काढावा लागत होता.

प्रतिसरकारचा कारभार समर्थपणे चालविणाऱ्या क्रांतिकार-कांनी न्यायदान संस्थेची रचना काळजीपूर्वक केली होती. न्याय काटेकोर व्हावा व तसे करताना कोणावरहि अन्याय होऊ नये अशी खबरदारी घेण्यात आली होती. ब्रिटिशांच्या अंमलाखाली असलेल्या मुलुखात जसे तालुका न्यायालय, जिल्हा न्यायालय वरिष्ठ न्यायालय आणि सुप्रीम कोर्ट ऊर्फ सर्वोच्च न्यायालय होते तशीच काहीशी ही रचना होती. मात्र एक महत्त्वाचा फरक होता. गाव पातळी पर्यंत प्रतिसरकारची न्यायसंस्था पाझरत गेली होती व सर्व थरांवर जनतेचा सहभाग अभिप्रेत होता व तो मिळेल अशी तजवीज त्या यंत्रणेतच करून ठेवण्यात आली होती.

या न्याय यंत्रणेतला अगदी तळाचा स्तर म्हणजे गट समिती. गट समितीची रचना वैशिष्ठ्यपूर्ण होती. काही गावांचा मिळून एक गट करण्यात आला होता. त्या गटात समावेश असलेल्या प्रत्येक गावाचा एक चिटणीस व एक निरीक्षक मिळून गट समिती तयार होत असे. एक गट साधारणपणे सात ते तेरा गावांचा असे. अशा तऱ्हेने बनलेल्या गट समितीचा चिटणीस, गट समितीचे सदस्य आपल्या मधूनच बहुमताने निवडीत असत. गटातल्या ज्या गावाहून तक्रार आलेली असेल त्या गावात गट समितीने जाऊन चौकशीचे व निवाड्याचे काम करावे असा नियम होता. स्थावर मालमत्तेची खरेदीपत्रे, मृत्युपत्रे, बक्षिसपत्रे, वारसा हक्कासंबंधीचे तंटे वगैरेची सुनावणी गट कमिटी पुढे होत असे. दिवाणी दाव्यामध्ये शंभर रुपयांपर्यंतच्या दाव्याची सुनावणी झाल्यावर समितीने एकमताने निर्णय दिल्यास वरिष्ठ समितीकडे अपील करण्याची सवलत नव्हती. क्रिमिनल प्रोसिजर प्रमाणे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट जी कामे करीत, तशा स्वरूपाची फौजदारी कामे गाव समिती चालवीत असे. गाव समितीच्या निर्णयावर गट समितीकडे अपील करण्याची सवलत होती. अपिलासाठी पंधरा दिवसांची मुदत ठेवली होती. अपील समितीच्या चिटणीसांकडे दाखल करावे लागे. गाव समितीच्या निकालाची अंमलबजावणी निरीक्षकामार्फत होत असे. क्रिमिनल स्वरूपाच्या तक्रार अर्जाकरता किमान आठ आणे फी होती. वरच्या न्यायालयात अपील करण्यासाठी दिवाणी स्वरूपाच्या खटल्यात शेकडा एक रुपया प्रमाणे फी आकारली जात असे. फौजदारी स्वरूपाच्या अपील अर्जासाठी एक रुपया फी होती. प्रत्येक समितीने आपल्या कामाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला पाठविला पाहिजे असा नियम होता. निरी-

क्षकांनी कामाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला वरिष्ठांकडे पाठवावयाचा असे. गाव समितीची बैठक आठवड्यातून एकदा भरविली पाहिजे असा दंडक होता. गाव समितीच्या बैठकीचा कोरम एकूण सभासद संख्येच्या दोन तृतियांश ठरविण्यात आला होता.

गटसमितीची बैठक महिन्यात दोन वेळा भरवावी असे बंधन घातले होते. गांव–समितीच्या निर्णयावर अपीलासाठी गट समिती अपील कोर्ट म्हणून काम करीत असे. गट समितीने दिलेल्या निर्णयावर अपील करण्यासाठी मध्यवर्ती समिती होती. या समितीकडे येणाऱ्या अर्जावर अर्जात नमूद केलेल्या विषयानुसार शेकडा दोन रुपये प्रमाणे फी ठेवली होती.

न्यायदान समितीचे कामकाज कसे चालत असे हे पहाण्या-सारखे आहे. गाव पातळीवरच्या समितीने दिलेला निकाल योग्य वाटला नाही म्हणून एकाने गट समितीकडे अपील केले. या अपील अर्जात तो म्हणतो,

" श्री न्याय सभा गट समिती यांचेकडे

अपील यादी देणार–आकाराम बाळा जाधव, रहाणार गोळे-श्वर अपील यादी देतो की, मजवर गाव-तडजोड कमिटी गोळेश्वर मौजे मजकूर येथील जागरू नाना जाधव याने अर्ज केले आणि गोळेश्वर तडजोड कमिटीने दिलेला निकाल मजला मान्य नाही. करिता माझ्या अर्जाचा गट समितीने सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी विनंती आहे. ही तक्रार यादी लिहून दिली.

ता. १७–४–४५ निशाणी अंगठा

(आकाराम बाळा जाधव)

अशा प्रकारच्या तक्रारी आल्यानंतर, रीतसर सुनावणी होत असे. पंचांचे मत ऐकून घेतल्यावर समिती आपला निर्णय देत असे. हे निर्णय कसे असत याचा एक प्रातिनिधिक नमुना पहा. दुशेरे गावच्या एका प्रकरणाची सुनावणी केल्यावर समितीने खालील-प्रमाणे निकाल दिला.

"ठराव–तडजोड कमिटीचा असा की,

१) अर्जदार याचे अर्जाप्रमाणे ता. ६–४–४५ रोजी मोजणी केली असता स. नं. ३०० या व तुकडपट्टीबरहुकूम हिस्सा असता लगतच्या शेतकरी गणू रामा याने हा स. नं. ३०२ ........... अर्जदार याचे म्हणणे प्रमाणे प्रत्यक्ष रान रेटलेचें कमिटीने स्वत: पाहिले आहे. ते रान अर्जदार यास द्यावे अशी कमिटीची आज्ञा झाली आहे.

२) तसेच अर्जाप्रमाणे स. नं. ५५ हा मोजणीदार घेऊन कमेटी ता. ७-४-४५ रोजी ४ वाजता गेली असता व मोजणी केली असता वरील स. नं. चे उत्तर दिशेचे तोंडाचे माप २ शंकू साखळचा व ५ कडचा असे येत आहे व दक्षिणेकडील बाजूचे माप २ साखळया व ४ आणे असे माप येत असून हद्दी कायम झालेनंतर अर्जदार यास कमिटीने व मोजणीदार यांनी हद्दीबरहुकूम धोंडे रोवण्यास लावले असता लगतचा शेतकरी रामा कृष्णा याने मोजणीदार यास अद्वातद्वा बोलून मी मुळीच धोंडा रोवू देणार नाही व कायम करू देणार नाही असे म्हणून कमेटीचे कामात अडथळा निर्माण करून कमेटीचा निष्कारण अपमान केला आहे.

१) अर्जातील लगतचा शेजारी रामा कृष्णा हा कमेटीतील पंच असून न्यायदानाचे दृष्टीने त्याचे हे वतन कमिटीस मुळीच मान्य नाही.

२) कमेटीने मोजणी करता लगतचा शेजारी याने स. नं. ५५ यात अदमासे ६–७ गुंठे रान जबरदस्तीने रेटून खात आहे असे कमेटीचें निदर्शनास आले आहे. तरी वरिष्ठ कोर्टानें मर्जीप्रमाणे अर्जदार यास योग्य न्याय द्यावा असे आमचे कमिटीचे एकमत आहे. ता. ८–४–४५ इ. सही (देशमुख)


या निवाड्यावर सात कमेटी सदस्यांच्या सेक्रेटरी मोडी लिपीत सह्या आहेत.

शेरा–अपील करण्यास परवानगी दिली आहे. ता. १४-४-४५"

खटल्याची सुनावणी कशी केली जात असे, निकाल कसे जाहीर करण्यात येत असत व न्यायदान योग्य व्हावे म्हणून कशी खबरदारी घेण्यात येत असे हे वर उद्‌धृत केलेल्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या उदाहरणांवरून कळून येईल. विकेंद्रित लोकशाहीचे तत्त्वज्ञान व त्या तत्त्वज्ञानाला अनुसरून न्यायदान पद्धती प्रति-सरकार चालविणाऱ्या क्रांतीकारकांनी रूढ केली होती ते पाहून मन थक्क होते.

□ □

म. ग्रं. मं. ... शाखा.
दा. क्र. २०७५
विषय प्रा-वा



# सरकारी खजिन्यावर धाड

प्रतिसरकारच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी ब्रिटिश सरकारला धक्क्यावर धक्के देऊन त्याचे शासन खिळखिळे करून टाकलेच. शिवाय चळवळ चालविण्यासाठी आर्थिक सहाय्य कमी पडू लागले असे पाहून सरकारी खजिने लुटण्याचा धाडसी उपक्रमहि हाती घेतला. अशा उपक्रमांपैकी धुळे खजिना लूट ही प्रमुख घटना आहे. तोपर्यंत आणि त्यानंतरही सरकारी पैसा हिसकावून घेऊन ताब्यात घेण्याचे अनेक प्रकार घडले व त्यातून लहान मोठ्या रकमा क्रांतिकारकांच्या हाती लागल्या. त्या सर्व चळवळीच्या कामी लागल्यामुळे खजिना लूट प्रकरण हे तशा घटनांपैकी एक प्रातिनिधिक घटना आहे. म्हणून तिचा सविस्तर परामर्श घेणे योग्य ठरेल.

भूमिगत क्रांतिकारकांचे संघटना कौशल्य, निधडेपणा आणि बेडरपणा यांचे प्रत्यंतर या घटनांचा मागोवा घेताना येते.

एकोणीसशे त्रेचाळीस साली भूमीगतांचीं चळवळ ऐन भरात होती. प्रतिसरकारची राजवट राबविण्याचे काम त्यांनी हाती घेतले होते. कोणत्याही राजवटीला पैसा हा लागतोच. सरकार जनतेवर कर लादून पैसा जमा करते. तो मार्ग प्रतिसरकारला बंद होता. इष्टही वाटत नव्हता. त्यांचे लक्ष सरकारी खजिने, सरकारी व रेल्वेच्या पे ट्रेन्स आदींकडे वळले. जेथे जमेल तेथे धाडी घालून सरकारी पैसा हस्तगत करण्याचे त्यांनी ठरविले व ते योजना आखू लागले.

आटपाडी येथे धुडकूभाऊ ठाकरे खादी केंद्राचे व्यवस्थापक होते. ते सूतकताईचे वर्ग चालवीत. त्या वर्गात खानदेशातले काही तरुण होते. बेचाळीसच्या लढ्याच्या सुरूवातीलाच त्यांच्या पैकी काहीजण सत्याग्रह करून तुरुंगात जाऊन आले होते. चळवळीत सामील झाल्यामुळे खानदेशातल्या शेकडो कार्यकर्त्यांना अटक झाली होती. अनेकांचे संसार उध्वस्त झाले होते. विपत्तीचा पहाड अंगावर कोसळलेल्या या लोकांना मदत कशी करावी याचा विचार करता करता त्या तरुणांच्या मनात सरकारी खजिना लुटण्याचे विचार घोळू लागले. आटपाडीच्या काही कार्यकर्त्यांच्या मदतीने पंढरपुरात तुफान सेनेचे सेनापती जी. डी. लाड यांची त्यांनी भेट घेतली. योजना शिजू लागली. हळूहळू आकार घेऊ लागली.

नागनाथ नायकवडी, जी. डी. लाड व खानदेशातले ते तरुण साक्री–शिरपूर या खानदेशातील तालुक्यांत सरकारी खजिना लुटण्याची योजना आखून प्रतिसरकारच्या राज्यात कुंडलला परत आले. परतण्यापूर्वी खानदेशातले एक युवक नेते विष्णू पाटील यांना त्यांनी विश्वासात घेतले. सारी पूर्व तयारी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी कुंडलला

परत येताना सरळ मार्गाने न येता सांगली, कोल्हापूर, निपाणी, कॅसलरॉक, लोंढा, पणजी असा प्रवास करत रिव्हॉल्व्हर्स, पिस्तुले, काडतुसे, हँड ग्रेनेडस् वगैरे हत्यारे गोळा करीत करीत सावंतवाडी मार्गे आटपाडी कुंडलला येऊन दाखल झाले. नंतर होल्डऑल-मध्ये त्यातली काही शस्त्रे व दारूगोळा भरून काही तरुण कार्य-कर्ते पांगून पांगून खानदेशाकडे निघाले. मजल दरमजल करीत ते प्रथम धुळ्याला व तेथून वडजाईला पोहोचले. वडजाई जवळच्या बोरकुंड येथे डॉ. उत्तमराव पाटील, जी. डी. लाड प्रभृती भूमिगत नेते त्यांना भेटले. त्या बैठकीत योजनेवर अखेरचा हात फिरविण्यात आला. धुळे पोलीस हेड क्वार्टर्सच्या हजेरी मास्तरांना भूमिगतांनी वश करून घेतले होते व त्यांचे सहाय्य मिळण्याची व्यवस्था केली होती.

तालुक्याचा खजिना लुटण्यापेक्षा जिल्ह्याच्या इंपीरिअल बँकेच्या शाखेतून नेहमी सर्व्हिस मोटारने खजिना जातो, तोच जंगल भागात मोटार अडवून लुटावा असे हजेरी मास्तरांनी सुचविले. कल्पना सर्वांना पसंत पडली. ती व्यवस्था वडजाईहून करता येईल असे त्यांनी सांगितले. थोडीशी चर्चा झाली. विष्णु पाटील व जी. डी. लाड यांना ती कल्पना मान्य झाली. खजिना नंदूरबारला जाणार आहे व त्यात पाच लक्ष, पन्नास हजार, आठशे पंचेचाळीस रुपये एवढी रक्कम आहे, असा निरोप तेरा एप्रिल एकोणीसशे चव्वेचाळीस रोजी सकाळी अकरा वाजता वडजाईला आला. त्या दिवशी धुळे पोलीस हेड क्वार्टर्सचे हजेरी मास्तरांनी काही कैदी पोलीस कस्टडीतून सबजेलमध्ये पोहोचविण्याच्या कामात स्वतःला गुंतवावे असे ठरले. फकीरा पाटील प्रभृती कार्य-कर्त्यांनी चिमठाण्याला 'बार' उडविण्याचे ठरविले. चिमठाणा गाव,

तेथले पोलीस ठाणे वगैरे नागनाथ नायकवडी, जी डी लाड, उत्तमराव पाटील प्रभृतींनीं नजरेखाली घातले व बारकाईने पहाणी केली. एप्रिलच्या तेरा तारखेला रात्री व्यंकटराव धोबी यांच्यासह सात कार्यकर्ते धुळ्याहून पायी चालत डांगुर्णे गावी पोहोचले. त्यांच्या पैकी चौघे जण टॅक्सीने चिमठाण्यास गेले. बाकीचे कार्यकर्ते बैलगाडीतून चिमठाण्याला आले. डांगुर्ण्याला आल्यावर त्या मंडळींनी खजिन्याची सर्व्हिस मोटार अडविण्याचा प्रयत्न केला. पण तो फसला. ते सातही कार्यकर्ते मग तातडीने धुळ्याला परतले.

दुपारी बारा वाजता चिमठाणा स्टॅंडवर खजिन्याची सर्व्हिस मोटार आली. काही उतारू चिमठाण्याला उतरले. उरलेले पंचवीस उतारू गाडीत मागच्या बाजूला बसले होते ड्रायव्हर जवळच्या कंपार्टमेंट मध्ये खजिना भरलेल्या आठ पेट्या ठेवलेल्या होत्या व अंगावर वर्दी असलेले दोन हत्यारी पोलीस, साध्या ड्रेस मधले दोन हवालदार आणि दोन ट्रेझरी कारकून कंपार्टमेंट मध्ये बसले होते. हातातल्या बंदुका पोलिसांनी खजिन्याच्या पेट्यांवर आडव्या ठेवल्या होत्या. चिमठाणे स्टॅंडवर ती मोटार थांबल्यावर चार भूमिगत कार्यकर्त्यांनी मोटारीत प्रवेश केला. ते विनातिकीट होते. नंदूरबारला लग्नाला जायचे आहे. वेळेवर पोहोचले पाहिजे असे म्हणत त्यांनी आरडा ओरडा करून बराच धिंगाणा घातला व स्टॅंडवरच्या एजंटाला ओरडून सांगून किसन पाटील, कळके आणि अण्णा मास्तर यांनी बाकावर बैठक मारली. डॉ. उत्तमराव पाटील खाली उतरले व मागाहून पाचच मिनिटात आलेल्या एका माल-मोटारीत बसून संकेत स्थळाकडे रवाना झाले. खजिन्याच्या मोटारीत ड्रायव्हरच्या मागे अण्णा मास्तर व पोलिसांच्या समोरच्या बाकावर कळके पाटील बसले होते.

...३

पूर्वी ठरल्या प्रमाणे डांगुर्ण्याच्या थोडे पुढे दोंडाईचे रोडवर चिमठाण्या पासून एक मैलावर गाडी उभी करून एक जण उतरला. ठरलेले संकेत स्थळ जवळ आल्याचा तो इशारा होता. नेते सावध झाले. मोटार चालू झाली. ती थोडे अंतर गेली. रस्त्याच्या अगदी मध्यभागी चार लोकांची मारामारी जुंपली होती. ती अगदी भरात आली होती. तोंडाने शिव्या देत, एकमेकांना तडाखे देत, गळे पकडण्याचा त्यांचा उद्योग चालू होता. मारामारी रस्त्याच्या अगदी मध्यभागी चाललेली पाहून ड्रायव्हरने तोंडाने शिव्या देत जोरजोराने भोंगा वाजविला. पण रस्त्यावरची ती नकली मारामारी जोरात चालूच राहिली. नागनाथ नायकवडी व धोंडीराम माळी हे प्रति-सरकारचे नेते खानदेशच्या शंकर माळी या कार्यकर्त्या बरोबर झोंबाझोंबी करीतच राहिले. ड्रायव्हरने गाडी बाजूने काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा मोटारीचा वेग कमी झाला. लगेच नागनाथ नायकवडीने फूट बोर्डावर उडी मारून ड्रायव्हरला गाडी थांबवण्याचा हुकूम केला. पण तो ऐकत नाही असे पहाताच ड्रायव्हरच्या हातावर पिस्तुलाने दोन गोळ्या झाडल्या. मोटारीतल्या पोलिसांनी खाली ठेवलेल्या बंदुकांना हात घालण्याचा प्रयत्न केला तेव्हा धोंडीराम माळीने मोटारीतच गोळी झाडली. ती ड्रायव्हरच्या डोक्याला लागली. मोटार थांबली. पोलीस हवालदार जखमी झाला. एका पोलिसाने धोंडीराम माळीचा पिस्तुल रोखलेला हात पकडला. धोंडीरामने तशाहि स्थितीत पिस्तुल वळवून त्या पोलीसावर झाडले. गोळी पोलिसाच्या छातीतून आरपार गेली व धोंडीरामचे एक सहकारी कळके यांच्या मनगटात घुसली. कळके यांच्या जखमेवर चांदीचा रुपया ठेवून जखम बांधली व रक्तस्राव थांबविला. त्यांच्या सहकाऱ्यांनी पोलिसांच्या बंदुका, काडतुसे व

ड्रेस ताब्यात घेतले. मोटारीची दोन चाके पंक्चर करून टाकली. प्रवाशांना गाडीतून उतरवून झाडाच्या सावलीत बसविले.

थोड्या अंतरावर थांबलेल्या उत्तमराव पाटलांना संकेत मिळाला होता. ते काही मिनिटात तेथे आले. खजिन्याच्या मोटारीचा ड्रायव्हर व जखमी पोलिसांच्या जखमा त्यांनी बांधल्या. पाचही ट्रंकातल्या नोटा त्यांनी धोतराचे गाठोडे करून त्यात बांधल्या. आठशे पंचवीस रुपयांची चिल्लर नाणी त्यांनी तेथेच टाकली आणि गाठोडे घेऊन भूमिगत कार्यकर्ते डोंगराच्या रस्त्याने लामकानी गावाच्या दिशेने चालू लागले सारी घटना दहा मिनिटांत घडली त्या वाटेने जाणाऱ्या एका मालमोटारीच्या ड्रायव्हरने गाडी थांबवून चौकशी केली. झाला प्रकार समजल्यावर खजिन्याच्या मोटारीची चाके त्याने दुरुस्त केली व जखमी पोलिसांना बरोबर घेऊन त्याने सिंदखेड पोलीस ठाणे गाठले. तेथून बातमी धुळे पोलीस स्टेशनला गेली. सिंदखेड व धुळे येथून पोलीस पथके लुटारूंच्या मागावर निघाली लामकानी गावाचे आसपास पोलीस पार्टी आणि खजिना लुटणारे प्रतिसरकारचे कार्यकर्ते यांची गाठ पडली व धुमश्चक्री सुरू झाली. दोन्ही बाजूंनी बंदुका कडाडू लागल्या. ही लढाई अर्धा तास चालली व अंधार पडू लागल्यावरच थांबली. पोलिसांची एक गोळी जी. डी लाड यांच्या एका पायाच्या पिंढरीतून आरपार गेली. धोंडीराम माळींनी आपली इजार फाडून त्यांचा पाय बांधला. एक गोळी धोंडीराम माळींच्या कुल्ल्याला चाटून गेली. तिसरी गोळी आली ती नागनाथ नायकवडींच्या कोटाच्या कॉलरला चाटून गेली व त्यांची मान होरपळली. धोंडीराम माळी रिव्हॉल्व्हर चालवून संरक्षण करीत होते. जी. डी. लाड आणि नागनाथ नायकवडी बंदूका चालवीत होते. डॉ. उत्तमराव पाटील नोटांनी

भरलेली गाठोडी जवळून वहाणाऱ्या ओढ्याच्या वाळूत खड्डा करून पुरून ठेवण्याच्या कामात गढले होते. पंधरा तारखेला नाथा लाड, पोलीस अधिकारी असल्याचे सांगत बोरकुंड गावात गेले. दमदाटी करून त्यांनी बैलगाड्या मिळविल्या व भूमिगत नेत्यांना साताऱ्याकडे रवाना करण्याची तजवीज केली.

लुटीत मिळालेल्या रक्कमेतला खानदेशाचा हिस्सा बाजूला काढून बाकीची रक्कम गाठोड्यात बांधून लपत छपत प्रवास करीत कुंडल पर्यंत पोहोचविली. त्याला घटना घडल्या पासून दीड महिना लागला. आटपाडीला भूमिगतांची बैठक झाली व कारवाईचा आढावा घेण्यात आला. लुटीपैकी पंचवीस टक्के रक्कम म्हणजे सव्वा लाख रुपये सेंट्रल डायरेक्टोरेटकडे म्हणजे अच्युतराव पटवर्धन यांच्याकडे पोहोचती करावयाचा निर्णय होऊन त्याची लगेच अंमलबजाणी करण्यात आली. कुंडल गटाच्या हाती दोन सव्वा दोन लाख रुपये आले. ते चळवळीसाठी व भूमिगतांच्या आणि तुरुंगात असलेल्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबीयांना अर्थसहाय्य करण्याच्या कामी खर्च झाले.

धुळे खजिना लुटीची घटना रोमहर्षक खरीच, तथापि आंदोलनाच्या काळातली ती काही एकुलती एक रोमहर्षक घटना नव्हे तशाच पण वेगळ्या प्रकारच्या घटना अन्यत्रही घडल्या. सातारा जिल्ह्यात घडलेली शिरवडे रेल्वे स्टेशन जळिताची घटना अशीच रोमांचकारी आहे. चले जाव आंदोलनाला सुरूवात झाल्यानंतर पहिल्या काही महिन्यातच ती घटना घडली. सातारा जिल्ह्यासाठी प्रमुख म्हणून यशवंतराव चव्हाण यांची नियुक्ती देशभरचे आंदोलन चालविणाऱ्या सेंट्रल डायरेक्टोरेटने म्हणजे मध्यवर्ती समितीने केलेली होती. सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागातल्या

कार्यकर्त्यांनी यशवंतरावांचे नेतृत्व कुरकूर करीत नाईलाजाने मान्य केले होते. तरी, इस्लामपूर–कऱ्हाडपासूनच्या जिल्ह्याच्या उत्तर भागातले कार्यकर्ते यशवंतराव चव्हाणांना मनापासून मानत होते. त्या कार्यकर्त्यांपैकी एक धडाडीचे, बिनीचे कार्यकर्ते होते कऱ्हाडचे सदाशिव पेंढारकर ! या पेंढारकरांनी त्या वेळच्या सदर्न मराठा रेल्वे नावाने ओळखल्या जाणाऱ्या रेल्वेचे दळणवळण बंद पाडण्याचा विडा यशवंतरावांच्या आदेशाने उचलला.

सदर्न मराठा रेल्वे म्हणजे ब्रिटिशांच्या कारभाराची महत्त्वाची धमनी. सदर्न कमांड या लष्करी मुख्यालयाचे लष्करी साहित्य आणि सैनिक यांची दक्षिण भागाकडची वाहतूक करण्याचे महत्त्वाचे साधन. ते साधनच जर उखडून टाकून निकामी करून टाकले तर युद्ध सहाय्याचे प्रयत्न लुळे पडतील असा सरळ साधा हिशेब पेंढारकरांच्या मनात होता. लढ्याच्या प्रारंभीच्या काळात यशवंतराव चव्हाण उत्साही होते. दळणवळणाच्या साधनांची मोडतोड करून त्यांचा विध्वंस करण्यावर त्यांचाहि विशेष भर होता. रेल्वे स्टेशने जाळून त्या स्टेशनांतली संदेशवाहक यंत्रणा निकामी करणे हा त्या योजनेचा एक भाग होता. यशवंतराव चव्हाणांची नजर पुण्याकडून येऊन कऱ्हाडवरून बंगलोरकडे जाणाऱ्या रेल्वे मार्गाकडे वळली. रेल्वे स्टेशने लुटून जाळण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे त्यांनी ठरविले.

तो कार्यक्रम त्यांच्या मनात आकार घेऊ लागला व त्यासाठी कोणाची नियुक्ती करावी याचा विचार ते करू लागले, तेव्हा आपोआपच सदाशिव पेंढारकर हे नाव त्यांच्या पुढे आले. तो कार्यक्रम निधडेपणाने पार पाडण्यासाठी पेंढारकरच सर्वस्वी योग्य आहेत असा त्यांच्या अंतर्मनाने कौल दिला. त्या कामासाठी

यशवंतराव चव्हाणांनी सदाशिव ढारपेकरांचा विचार करावा असाच तो तरुण होता. यशवंतराव आणि सदाशिव पेंढारकर दोघेही कऱ्हाडचे रहिवासी. परस्परांचा चांगला परिचय. यशवंतराव काँग्रेस संघटनेचे कार्य करीत होते आणि सदाशिव पेंढारकर पुण्यात कॉलेजमध्ये शिकत क्रिकेटचे मैदान गाजवीत होते. तसे करत असतानाहि त्यांच्या हृदयात राष्ट्रवादी विचाराची ज्योत मंदपणे तेवत होती. कऱ्हाडचे काँग्रेस नेते या नात्याने यशवंतरावांचा सदाशिव पेंढारकर यांच्याशी संबंध आला होता.

पदवी परीक्षा पदरात पाडून घेऊन पेंढारकर, चले जाव आंदोलन सुरू झाले तेव्हा किर्लोस्करवाडीला किर्लोस्करांच्या कारखान्यात, मला वाटते विक्री भागाकडे काम करत होते. किर्लोस्करांची आंदोलनाला सहानुभूती होती. पेढारकरांनाही स्वस्थ बसवत नव्हते. त्यांनी आंदोलनात उडी घेतली आणि यशवंतराव चव्हाणांच्या मार्गदर्शनाखाली काम करायला सुरूवात केली. सदर्न मराठा रेल्वेचा मार्ग उध्वस्त करण्याचे विचार यशवंत-रावांच्या मनात घोळू लागले तेव्हा त्या कामासाठी सदाशिव पेंढारकर योग्य माणूस आहे असे त्यांच्या मनाने घेतले. एक दिवस पेंढारकर यांच्या जवळ त्यांनी तो विषय काढला. पेंढारकरांना कल्पना आकर्षक वाटली. त्यांनी ती तात्काळ आत्मसात केली व ते उत्साहाने कामाला लागले.

अनेक स्टेशनांची पहाणी व सारासार विचार करून पहिला प्रहार कऱ्हाड पासून काही अंतरावर असलेल्या शिरवडे स्टेशनवर करण्याचे ठरले. प्रत्येक महत्त्वाच्या स्टेशनात त्या काळात सशस्त्र पोलीसांचा कायमचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसा तो शिरवडे स्टेशनवरहि होता. स्टेशनावर हल्ला करून तेथली तारायंत्र

आदि यंत्र सामग्री मोडून तोडून स्टेशन जाळून टाकावयाचे म्हणजे तेथे असलेल्या सशस्त्र पोलिसांच्या बरोबर मुकाबला करणे ओघानेच आले. तसा मुकाबला करण्यासाठी निधडचा छातीच्या बेडर कार्यकर्त्यांची आवश्यकता होती. पेंढारकरांनी तशा कार्यकर्त्यांचा एक संच उभा केला. त्यांना तावून सुलाखून घेतले, ऐन वेळी धीर सुटून कोणी गर्भगळीत होणार नाहीना, हातपाय गाळणार नाहीना अशी खात्री करून घेतली. आणि पेंढारकर झपाट्याने कामाला लागले.

तसे पाहिले तर अशा प्रकारच्या कामाचा पेंढारकरांना पूर्वानुभव नव्हता, असावयाचे काही कारणहि नव्हते. मनसोक्त क्रिकेट खेळावे, ज्या कॉलेजमध्ये ते पुण्यात शिकत होते त्या एस. पी. कॉलेजची त्यांच्या कॅप्टनशिपखाली खेळणारी टीम सामन्यात विजयी करावी, परिक्षेत गोता मिळणार नाही इतपत अभ्यास करून परीक्षा चांगल्या प्रकारे उत्तीर्ण व्हावे आणि क्रिकेटचे मैदान गाजवावे असे त्यांचे दिवस चालले होते. क्रिकेट-मधील त्यांच्या नैपुण्यामुळेच खरे म्हणजे किर्लोस्करांनी त्यांना आपल्या कारखान्यात नोकरी दिली होती. किर्लोस्करवाडीचा क्रिकेट संघ त्या काळात नामवंत संघ मानला जात होता. हाडाचा खेळाडू मोठा उमदा असतो, स्वभावाने तो मोकळा असतो. थट्टा-मस्करी करावी, चार द्यावेत चार घ्यावेत, स्पर्धा करावयाची ती अगदी जीव ओतून करावी. आणि एकदा डाव संपला की ईर्षा, स्पर्धा सारे विसरून खिलाडूपणाने प्रतिस्पर्ध्याच्या हातात हात घालावा, अशी त्याची वृत्ती असते. सदाशिव पेंढारकर तसेच होते. तथापि त्यांच्या मनात आत आत खोलवर कोठें तरी एक स्फुल्लिंग स्फुरत होता. ज्योतीत रूपांतर होण्याच्या क्षणाची तो

वाट पहात होता. आठ ऑगस्टला मुंबईत गोवालिया टँक मैदानावर महात्मा गांधींनी हिंदुस्तानच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना चले जाव म्हणून बजावले व प्रत्येक भारतीयाने स्वतःला स्वतंत्र मानून मानेवरचे ब्रिटिश सत्तेचे जू झुगारून द्यावे असा आदेश दिला. तेव्हा सदाशिव पेंढारकरांच्या हृदयातील स्फुल्लिगाची ज्योत बनली होती, तिची ज्वाला झाली ! पेंढारकरांच्या जीवनात परिवर्तन होण्याचा क्षण आला होता.

तसा क्षण प्रत्येकाच्या जीवनात केव्हा ना केव्हा तरी येत असतो. परंतु तो क्षण येतो आणि जातो असेच बहुतेकांच्या बाबतीत होते. लाखात एखाद्याच्या बाबतीत तो क्षण क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणारा ठरतो. पेंढारकरांच्या जीवनात तो क्षण आमूलाग्र परिवर्तन घडविणारा ठरला. नोकरीपेशा पत्करून धोपट मार्गाने जीवन व्यतीत करणारा व क्रिकेट खेळाचा छंद जपणारा एक उमदा तरुण क्रांतिकारक बनला. हातात पेटलेले धगधगते निखारे घेऊन क्रांतीच्या मार्गावर तो वाटचाल करू लागला. यशवंतराव चव्हाणांना त्याच्या मनातली धग जाणवली व त्यांनी निर्धास्तपणे त्याच्यावर जोखीम टाकली.

सदर्न मराठा रेल्वेची स्टेशने जाळण्याचा एक मोठा कार्यक्रम आखण्यात आला. त्या कार्यक्रमाचा प्रारंभ शिरवडे स्टेशनपासून करण्याचे ठरले. प्राथमिक पहाणी करण्यात आली. स्टेशनवर पोलीस किती असतात, त्यांच्याजवळ हत्यारे किती व कोणत्या प्रकारची, त्यात बंदुका किती, त्या कोठे ठेवलेल्या असतात वगैरेंची अगदी बारकाईने पहाणी करण्यात आली. शिरवडे स्टेशन तसे आड बाजूचे. एरवी सुद्धा त्या स्टेशनवर गाडीत चढणाऱ्या उतरणाऱ्यांची वर्दळ तशी कमीच. तथापि ऐन वेळी कसला धोका

निर्माण होऊ नये आणि अचानक एखादे विघ्न निर्माण होऊ नये म्हणून सर्व प्रकारची सावधगिरी घेण्यात आली. प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ दिवस पश्चिमेकडे कलल्यानंतरची ठरविण्यात आली. पुण्याकडून वा मिरजेकडून त्यावेळी कोणतीही गाडी शिरवडे स्टेशनात येण्याची शक्यता नाही अशी खात्री करून घेण्यात आली. मग सदाशिव पेंढारकर आणि त्यांचे सहकारी स्टेशनच्या रोखाने झपाट्याने निघाले. स्टेशनच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी दोन्ही बाजूच्या टेलिग्राफच्या व टेलिफोनच्या तारा तोडून टाकल्या व ते स्टेशनात घुसले. स्टेशन मास्तरच्या कार्यालयात जणू काही वादळच घुसले होते. पेंढारकरांनी अगोदरच प्रत्येकाला ज्याचे त्याचे काम वाटून दिले होते. तरीही ते सूचना देत होते व कार्यकर्ते झपाट्याने कामे उरकीत होते. प्रथम जुडगा करून उभ्या करून ठेवलेल्या पोलिसांच्या बंदुका ताब्यात घेण्यात आल्या. भरलेल्या बंदुका रोखून त्या सर्वांना स्टेशन स्टाफसह एकत्र करण्यात आले. त्यांना कसलीही हालचाल करता येणार नाही इतपत त्यांचा बंदोबस्त केला.

स्टेशनवरच्या चाकर–नोकरांच्या भीतीने अगदी शेळ्या झाल्या होत्या ! बेंबाटण्या इतके सुद्धा अवसान त्यांच्या पाशी उरले नव्हते. क्रांतिकारकांनी स्टेशनमधली सारी यंत्र–सामुग्री मोडून तोडून टाकली. स्टेशनच्या आत आणि बाहेर रॉकेल तेलाचा सडा शिंपला. काही ज्वालाग्राही पदार्थ मधून मधून पसरून ठेवले आणि काडी शिलगावली. अग्नी नारायण बऱ्याच दिवसांचा उपाशी असावा. एखाद्या भुकेने वखवखलेल्या प्राण्यासारखा त्याने शिरवडे स्टेशनचा घास घेतला. ज्वाला भडकल्या, गगनावेरी झेप घेऊ लागल्या. अपेक्षेप्रमाणे आपले काम पार पडले आहे असे पाहून सदाशिव

पढारकरांनी आपल्या कार्यकर्त्यांना परतण्याचा इशारा दिला. स्टेशनात पहाऱ्यावर असलेल्या पोलिसांच्या हिसकावून घेतलेल्या बंदुका त्यांनी खांद्याला लटकविल्या आणि जसे काही ते हवेतूनच स्टेशनवर टपकले होते तसे हवेतच अंतर्धान पावले ! ते आले कोठून हे जसे समजले नाही तसे गेले कोठे हेही कळले नाही. जाताना ते सगळे पांगून पांगून गेले. त्यांच्यापैकी एक कुंडलचे रामूअण्णा पवार शिरवडे स्टेशनातून बाहेर पडले ते त्यांनी समोरचा डोंगर गाठला. पोलिसांकडून हिसकावून घेतलेली बंदुक त्यांनी खांद्याला लटकावली होती. तिचे काय करावे हे त्यांना उमगत नव्हते. ती जवळ ठेवून वावरण्यात तर धोका होता. अखेर त्यांनी मनाशी निर्णय केला. भल्या पहाटे त्यांनी ओगलेवाडी गाठली. यशवंतराव चव्हाण ओगलेवाडीत व्यंकटराव ओगल्यांच्याकडे आहेत हे त्यांना ठाऊक होते यशवंतरावांची त्यांनी भेट घेतली. खांद्यावरची बंदुक त्यांच्या स्वाधीन केली आणि पहाटेच्या झुंझूमुंजू प्रकाशात ते नाहीसे झाले.

ही घटना सातारा जिल्ह्याच्या कलेक्टरांना आणि जिल्हा पोलीस प्रमुखांना कळली तेव्हा लाल बुंद गोरे असलेले ते अधिकारी संतापाने हिरवे पिवळे झाले. शिरवडे रेल्वे स्टेशनवरचा पोलीस बंदोबस्त निष्प्रभ करून क्रांतिकारकांनी ते नुसते जाळून टाकले एवढेच नव्हे, तर तेथे पहाऱ्यावर असलेल्या पोलिसांच्या बंदुकाही त्यांनी हिसकावून घेतल्या होत्या. जणू काही आपल्यालाच क्रांतिकारकांनी विवस्त्र करून टाकले आहे असे त्या उभय गोऱ्या अधिकाऱ्यांना वाटले आणि ते विलक्षण चवताळले. तपासासाठी त्यांनी जाळे फेकले. डोक्यावरचे केस विंचरावेत तसा कऱ्हाड तालुका आणि आसपासचा भाग त्यांनी विंचरून काढला. धाग्याने

धागा जोडीत ते चालले व अखेरीस सदाशिव पेंढारकर व त्यांचे सहकारी त्यांच्या हाती लागले. आरोपींना क्रूरपणाने, अमानुष मारहाण करण्यात आली. त्या मारहाणीत यशवंतराव चव्हाणांचे अगदी कोवळ्या वयाचे भाचे बाबूराव कोतवालही सापडले. त्यांना बेदम मारण्यात आले. यथाकाळ न्यायालयात खटला उभा राहिला आणि न्यायाधीशांनी आरोपींना दीर्घ मुदतीच्या सक्त मजुरीच्या शिक्षा दिल्या. सदाशिव पेंढारकर व रंगनाथ पाटील ७ वर्षांची सजा घेऊन तुरुंगाच्या गजा आड बंद झाले. बब्रु वाहन, बाबू कोतवाल व अन्य आरोपींनाही विविध शिक्षा झाल्या.

शिरवडे रेल्वे स्टेशन जळित प्रकरणाचे पर्व येथे संपले. पण त्यातूनच दुसऱ्या एका दुर्दैवी पर्वाला सुरूवात झाली. तुरुंगात पेंढारकरांनी गांधीवाद मार्क्सवादावरचे मूळ ग्रंथ वाचायला सुरूवात केली. पुस्तकांच्या संगतीत ते सुखाने आणि आनंदाने कालक्रमणा करीत असताना तुरुंगात एक दिवस एक अनोळखा पाहुणा त्यांच्या भेटीला आला आणि त्याने त्यांना अगदी कडकडून मिठी मारली. त्या पाहुण्याचे नाव कर्क रोग ! सेहेचाळीस साल उजाडले. स्थानबद्ध आणि शिक्षा झालेले बहुतेक राजबंदी सुटले. सदाशिव पेंढारकरांचे ज्येष्ठ मित्र यशवंतराव चव्हाण मुंबई प्रांताच्या खेर मंत्रिमंडळात पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले, तरी पेंढारकर तुरुंगातच होते. कर्क रोगाने त्यांचा पूर्ण ताबा घेतला. अखेर त्या रोगाने त्यांचा घास घेतला. एक झुंजार उमदे जीवन बहरण्यापूर्वीच कोळपले, सुकून गेले !

□ □

# भूमिगत नाना पाटील

सातारा जिल्ह्यात ब्रिटिश राजवटीविरुद्ध सशस्त्र उठाव करून व प्रतिसरकार स्थापन करून तें चौदा महिने यशस्वीपणे चालविण्याचा जो महान पराक्रम त्या जिल्ह्यातल्या क्रांतिकारकांनी केला, ती घटना म्हणजे स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातला एक चमत्कार मानण्यात येतो. हा चमत्कार घडविणारे जे नेते होते त्यांचा मेरुमणी होते–नाना पाटील ! बेचाळीसचा स्वातंत्र्य लढा समाप्त होऊन स्वातंत्र्य जेव्हा दृष्टीपथात आले, तेव्हा महाराष्ट्राच्या जनतेने नाना पाटलांना क्रांतिसिंह ही उपाधि सन्मानपूर्वक अर्पण केली. महाराष्ट्राच्या जनतेच्यावतीने आचार्य प्रल्हाद केशव अत्रे या प्रतिभाशाली साहित्यिक–पत्रकाराने हे काम केले. त्यांना देण्यात आलेली ही उपाधी सार्थ होती. सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापन करण्याची ही कल्पना नाना पाटलांची आणि तिचे नियोजन आणि कार्यवाहीही नाना पाटलांचीच. अर्थात

त्यांना जे यश मिळाले ते, त्यांना देशभक्तीने भारलेले धाडसी आणि कर्तृत्ववान, तडफदार सहकारी मिळाल्यामुळे. सातारा जिल्ह्याच्या ज्या एका विशिष्ट भागात नाना पाटलांनी प्रति-सरकारचा झेंडा उभारला त्या भागाची भौगोलिक परिस्थितीहि त्यांना अनुकूल होती. ज्या कुंडल गावात त्यांनी वास्तव्य केले होते तो गाव औंध संस्थानच्या वेशीच्या आत-बाहेर असल्यासारखा होता. औंधचे अधिपती श्रीमंत भवानराव पंत प्रतिनिधी त्यावेळी गादीवर होते आणि त्यांचे चिरंजीव बॅ. अप्पासाहेब पंत संस्थानच्या लोकशाहीच्या राजवटीचे पंतप्रधान होते, तीही एक इष्ट घटना होती.

भवानराव पंत प्रतिनिधी भारतातल्या अन्य संस्थानिकांहून वेगळे होते. आणि त्यांचा पंतप्रधानही इतर संस्थांच्या दिवाणापेक्षा सर्वस्वी निराळा होता. त्या पिता-पुत्रांनी महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार संस्थानची सत्ता प्रजेला सुपूर्त केली होती. लोक-प्रतिनिधी संस्थानचा कारभार चालवीत होते. "राजा म्हणजे राज्याचा उपभोगशून्य स्वामी" हे वाक्य प्रतिभावंत नाटककार कै. राम गणेश गडकरी यांनी औंधच्या पंत प्रतिनिधींच्याकडे पाहूनच उच्चारले असेल काय, असा संभ्रम मनात निर्माण व्हावा इतकी या पिता-पुत्रांची लोकशाहीनिष्ठा बावनकशी होती. आप्पासाहेब पंतांचा कुंडल–गटाला आधार वाटत होता तो काही उगीच नव्हे. ज्यांना ब्रिटिश सरकारने 'फरारी' म्हणून जाहीर केले होते व ज्यांना पकडून देण्यासाठी हजार रुपयांपासून पाच हजार रुपयांपर्यंत इनामे जाहीर करण्यात आली होती, असे क्रांतिकारक ब्रिटिशांच्या पोलीसांचा ससेमिरा असह्य झाला म्हणजे औंध संस्थानच्या हद्दीत प्रवेश करीत व खुलेपणाने

वावरत. औंधचे सरकार त्यांच्या हालचालींकडे कानाडोळा करी. वेळ प्रसंगी त्यांना जरूर ते सहाय्यही हस्ते परहस्ते दिले जात असे. इंग्रज अधिकाऱ्यांनी फारच लकडा लावला तर त्यांना संस्थानच्या तुरुंगात बंदिवान करून ठेवण्यात येई. तथापि ते तुरुंगही असे नमुनेदार की ते क्रांतिकारक दिवसा उजेडी आपापल्या भागात जाऊन कार्य करीत व रात्रीला विसाव्याला तुरुंगात येत. संध्याकाळची कैद्यांची 'गिनती' ते चुकू देत नसत! प्रतिसरकार स्थापन करण्यासाठी नाना पाटलांनी कुंडल भागाची निवड अक्कलहुशारीने व दूर दृष्टीने केली असली पाहिजे. शिवाजी महाराजांनी दुर्गम मावळ खोऱ्याची निवड स्वराज्याचे तोरण बांधण्यासाठी करून तोरणा किल्ल्यावर मराठी राज्याचा झेंडा उभारला ही घटना आणि कुंडल भागात प्रतिसरकारचा ध्वज नाना पाटलांनी उभारला ही घटना, या दोन्ही घटना सारख्यात तोलामोलाच्या आहेत.

ब्रिटिश सरकारच्या पोलिसांनी प्रयत्नांची शर्थ केली, अगदी जंग जंग पछाडले तरी अखेरपर्यंत नाना पाटील त्यांच्या हाती लागले नाहीत. सिंह जसा दुर्गम जंगलात, गुहेत राहतो तसे नाना पाटील कुंडल भागात वास्तव्य करून होते. सिंहाच्या गुहेत प्रवेश करून त्यांच्या आयाळीला हात घालण्याचे धाडस काही ब्रिटिश अधिकाऱ्यांनी करून पाहिले, पण त्यांना हात चोळीत परत फिरावे लागले. नाना पाटलांच्या भोवती तुफान सैनिकांचे संरक्षक कडे नेहमी असे. अनोळखी, परक्या माणसाला त्या कड्याचा भेद करून नाना पाटलांच्या पर्यंत पोहोचणे अशक्य होते. पुष्कळ वेळा कुंडलच्या गुहेतून बाहेर पडून नाना पाटील स्वैर संचाराला निघत. असेच ते एकदा संचाराला बाहेर पडले होते. गिल्बर्ट नावाच्या

सातारा जिल्ह्याच्या गोऱ्या पोलीस प्रमुखाने नाना पाटलांना पकडण्याचा विडा उचलला होता.

ताकारीच्या डाक बंगल्यावर त्याने तळ ठोकला होता. दिमतीला दोन हजार हत्यारी पोलिसांची फौज होती. एकदा त्याला नाना पाटील जवळच्या गावात असल्याची खबर मिळाली. ती मिळताच त्याने आपला फौजफाटा बाहेर काढला आणि त्या गावाला वेढा घातला. प्रत्येक घर त्याने तपासायला सुरुवात केली. नाना पाटील तेव्हा एका न्हाव्याकडून दाढी करून घेत होते. तपास करत करत पोलीस त्या दुकानाच्या रोखाने निघाले. ते येत आहेत ही खबर नाना पाटलांच्या पर्यंत अगोदरच पोहोचली होती. पोलिसांना चकविण्यासाठी नाना पाटलांनी काय युक्ती करावी? दांगट नावाच्या शाहीराने एका पवाड्यांत त्या युक्तीचे वर्णन केले आहे.



शाहीर म्हणतो,

एकदा काय प्रकार घडला।
नाना पाटील बसला दाढी करायला।
तेचा लागला सुगावा पोलिसाला।
पोलीस गेलं पाटलाला पकडायला।
नाना पाटील लई चतुराईनाला।
मागून पोलिस येताना आरशात बघितला।
चटकन् आपल्या दाढीचा साबण पुसला।
न् न्हाव्याच्या दाढीला साबण लावला।
नाना पाटील लागला न्हाव्याची दाढी करायला।
तोवर पोलिसांचा वेढा पडला।
पोलिसांनी न्हाव्यालाच पकडून नेला।
घोपटीसकट नाना पाटील पळून गेला।
जी जी ।।

नाना पाटील असेच एकदा आपल्या गुहेतून बाहेर पडले होते. पोलिसांना झुकांडचा देत गावोगावी त्यांनी दौराच काढला. सभेमागून सभा ठोकल्या. एका गावातली सभा संपली तेव्हा उत्तर रात्र झाली होती. नाना पाटील एकटेच निघाले. कृष्ण पक्षातले फिकट चांदणे पडले होते. पोलिसांना सुगावा लागला होता. पाठलाग करीत ते झपाट्याने येत होते. दोघांमधले अंतर कमी कमी होत होते. नाना पाटील क्षणभर उभे राहिले. त्यांनी आजूबाजूला नजर टाकली. थोड्या अंतरावर एक चंद्रमौळी झोपडी दिसत होती. नाना पाटलांनी मनाशी थोडा विचार केला. झरझर पावले टाकीत ते झोपडी जवळ गेले व कुडाच्या दारावर त्यांनी थाप मारली. आत झोपलेल्या शेतकऱ्याने दार उघडले. नाना

पाटील त्याला म्हणाले, "मी नाना पाटील, पोलीस पाठीवर आहेत." त्यांना पुढे काही सांगावे लागलेच नाही. त्याने नाना पाटलांना आत घेतले. त्याची पत्नी व लहान मुलगी गोधडीच्या अंथरूणावर घोंगडी पांघरून शांतपणे झोपली होती. त्या शेतकऱ्याने नाना पाटलांना आपल्या पत्नी शेजारी झोपविले व आपली घोंगडी त्यांच्या अंगावर पांघरली. त्याने दुसरे घोंगडे घेतले. खोपटाचे दार लोटून घेतले आणि बाहेरच्या ओटयावर घोंगडे आंथरले, चिलीम भरली आणि शांतपणाने चिलीम ओढीत बसला. तोपर्यंत अंदाजा प्रमाणे दोन पोलीस तेथे आलेच त्यांनी नाना पाटलांचा ठावठिकाणा त्या शेतकऱ्याला विचारला; इकडेच कोठे तरी ते आले आहेत असे म्हणाले.

तो शेतकरी म्हणाला, "नाही बा! इकडं तर कोणीच आलं नाही. गेले असतील पुढं कुठं तरी. नाना पाटील माझ्या झोपडी-कडं कशाला येत्याल!"

पोलीस म्हणाले "इकडं कोणी आलं नाही म्हणतोस? बरं पण झोपडीत कोण आहे? आणि तू बाहेर का बसला आहेस?"

शेतकरी म्हणाला,

"माझी बहीण आणि मेहुणे दोघे जण झोपलेन आत"

मग तू कोण, असे पोलिसांनी जरा संशयानंच खडसावून विचारले. तेव्हा तो उद्‌गारला,

"मी लांब तिकडचा पाहुणा आहे बहिणीकडे आलो आहे काल."

पोलीस म्हणाला, "खरं सांगतोस?"

...४

शेतकऱ्याने उत्तर दिले "देवाच्यानं. खोट कशापाई बोलू ?" तरीहि पोलिसांनी झोपडीचं दार उघडायला लावलं. नवरा-बायको शांत झोपलें होते! मंदपणे घोरत होते! पोलीस निघून गेले. पहाटेपर्यंत शेतकरी झोपडीच्या बाहेर घोंगड्यावर शांतपणे पडून राहिला. पहाट झाली. झोपडीचं दार उघडलं. नाना पाटलांनी शेतकरी पती-पत्नींना नमस्कार केला आणि पहाटेच्या अंधुक प्रकाशात ते शेतकऱ्याच्या वेशात शेताकडे जाण्याच्या मिषाने बाहेर पडले, चालू लागले !

नाना पाटलांच्या किंचित् उपयोगी पडता आलं म्हणून तो शेतकरी आनंदला होता. खेड्या-पाड्यातल्या लोकांचा एवढा विश्वास नाना पाटलांनी मिळविला होता. अंथरूणात आपल्या पत्नीच्या शेजारी नाना पाटलांना कसे दडवून ठेवावे, अशीं शंका त्याच्या मनातसुद्धा आली नाही. जनतेचा विश्वास हेच प्रति-सरकारच्या नेत्यांचे खरेखुरे सामर्थ्य होते. त्या सामर्थ्याच्या बळावरच त्यांनी बलाढ्य ब्रिटिश सरकार बरोबर झुंज दिली.

अशीच आणखीही एक घटना आहे. कर्नाटक भागात ब्याकूड या गावी वसंतराव पाटील (माजी महसूल मंत्री, कर्नाटक राज्य) यांचा विवाह समारंभ होता. त्यासाठी साताऱ्याहून सुमारे दीडशे भूमिगत कार्यकर्ते गेले होते. त्यात नाना पाटील, जी. डी. लाड, प्रभृती प्रतिसरकारचे नेतेही होते. त्या भागात भाषा कानडी. प्रतिसरकारचे नेते तोंडात मिठाची गुळणी धरून होते. जे काही बोलावयाचे ते नवरदेव वसंतराव पाटीलच बोलत. दुभाषाचे काम ते करीत. दुसऱ्या दिवशी लग्न होते. पहाटेपासूनच घाई उडाली होती. माडीवर बैठक घातली होती. माडी निमंत्रितांनी भरून गेली होती. नाना पाटील जरा बाजूला एका कोपऱ्यात बसले होते.

ब्याकूड गाव ज्या तालुक्यात आहे त्या तालुक्याच्या पाध्ये नावाच्या फौजदारांना लग्नासाठी नाना पाटील आले आहेत अशी बातमी कशी कोण जाणे पण समजली होती. नाना पाटलांना पकडण्यासाठी पोलीस पार्टी घेऊन ते वाड्यावर आले. वसंतराव पाटलांचा वाडा भला मोठा, तीस पस्तीस खोल्यांचा ! ज्या दिवाणखान्यात लग्नासाठी आलेल्या पाहुण्यांसाठी बैठक घातली होती तो दिवाणखाना निमंत्रितांनी भरून गेला होता. फौजदारांनी बारीक नजरेने दिवाणखाना न्याहाळला. त्या जमावात नाना पाटील त्यांना आढळले नाहीत. वाड्याचा सगळ्या तीस–पस्तीस खोल्या त्यांनी तपासल्या. नाना पाटील कोठेच दिसले नाहीत. पाध्यांची खात्री होती की नाना पाटील लग्न समारंभाला आलेले आहेत. त्यांनी वसंतराव पाटलांना दमदाटी करण्यास सुरूवात केली. मुहूर्ताची वेळ झाली. लग्न घटिका भरत आली. तसे वसंतराव पाटील बोहोल्याकडे गेले. पाध्ये फौजदार हातात पिस्तुल घेऊन सभोवार नजर ठेवून होते.

दरम्यान वाय. सी. पाटील आणि एक भूमिगत कार्यकर्त्या राजमती पाटील यांनी नाना पाटलांना धनगराचा वेश दिला. त्यांनीही झटपट तो अंगावर चढवून वेशांतर केले. त्या उभयतांनी दूधवाल्या शेतकरी पती पत्नीचा वेश धारण केला. सर्वांच्या डोळ्यासमोर ते तिघेजण वाड्यातून बाहेर पडले. वेशांतर केलेल्या नाना पाटलांना त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या हद्दीपर्यंत नेऊन पोहोचविले. त्यांनी कोल्हापूरच्या हद्दीत प्रवेश केल्यावरच ते माघारी फिरले. इकडे लग्न लागले, वधू–वर कोचावर यऊन बसले. निमंत्रित मंडळी त्यांच्या हातात आहेर देऊ लागली. नाना पाटील यांच्या वतीने एका दहा-बारा वर्षांच्या मुलाने वराच्या हातात भेट



२०५५ ९/३/८८

वस्तू ठेवली !


स्वत:ला निष्ठावंत गांधीवादी समजणाऱ्या काही नेत्यांनी साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या आंदोलनाला नाके मुरडली आहेत. गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाला धरून ते आंदोलन नाही, काँग्रेसच्या नावाला त्या आंदोलनाने बट्टा लावला अशी त्यांची भूमिका आहे. महात्मा गांधींचे नाव घेऊन नाके मुरडणाऱ्या या निष्ठावंत गांधीवादी बुजूर्गांना स्वत: गांधींनी या आंदोलनाबाबत काय उद्गार काढले हे बहुधा ठाऊक नसावे. गांधीजींचे ते उद्गार हेच त्यांना चोख उत्तर आहे.

एकोणीसशे चव्वेचाळीस साली मे महिन्यात महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका झाली. सुटकेनंतर विश्रांतीसाठी ते पांचगणीला जाऊन राहिले होते. नाना पाटील व त्यांचे काही प्रमुख सहकारी पोलिसांची नजर चुकवून गांधीजींना भेटण्यासाठी गेले. गांधीजींच्या कानावर साताऱ्याची प्रतिसरकारची चळवळ व नाना पाटलांचे कार्य गेले होते. गांधीजींनी नाना पाटील व त्यांचे भूमिगत सहकारी यांना भेट दिली. नाना पाटील मोडक्या तोडक्या हिंदी भाषेत महात्माजींच्या बरोबर बोलले. त्यांचे बोलणे ठोस, मुद्देसूद व रोखठोक होते. गांधीजी शांतपणे ऐकत होते. नाना पाटील म्हणाले, "महात्माजी, मी व माझ्या सहकाऱ्यांनी सातारा जिल्ह्यात जे कार्य केले ते तुमच्या सत्य–अहिंसेच्या तत्त्वात कुठे बसते हे मला माहित नाही, पण आम्ही काम करतेवेळी तुमची तत्त्वे शक्य तेवढी अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. आम्ही रेल्वे गाड्या पाडल्या पण माणसांची एकहि गाडी पाडली नाही. जो हात खून, बलात्कार, दरोडे घालीत होता, तो हात आम्ही तोडला. जें पोलिसांचे खबरे होते, त्यांना पत्र्या लावल्या. आम्ही हे जर केले

नसते तर आम्हाला कांहीहि काम करता आलें नसते, आम्ही चळवळ करू शकलो नसतो. तुम्ही ऑगस्ट बेचाळीस मध्ये 'करेंगे या मरेंगे' हा जो आम्हास आदेश दिला व राष्ट्रीय नेते तुरुंगात गेले तर प्रत्येक भारतीयाने स्वतःस स्वतंत्र मानून बुद्धीला पटेल त्यानुसार इंग्रजांना घालवून देण्यासाठी चळवळ उभारावी हाही आदेश दिला, त्यानुसार आम्ही आमच्या बुद्धीला पटले त्याप्रमाणे चळवळ केली. शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याने आम्ही लढलो."

यावर गांधीजी उद्‌गारले, "नाना पाटील, तुमची चळवळ माझ्या तत्वात बसते न बसते यापेक्षा, तुम्ही बेचाळीसची स्वातंत्र्य चळवळ जिवंत ठेवली, साताऱ्याने या चळवळीचे नाव राखलें हे महत्त्वाचे होय. नाना, तुम्ही बहादूर आहात. भ्याडाच्या अहिंसे-पेक्षा शूराची हिंसा परवडेल असं मानणारा मी आहे!" (संदर्भ: 'क्रांतिसिंह नाना पाटील' या पुस्तकातला लेख: लेंखक नाथाजी लाड. लेखाचे नाव 'क्रांतिसिंह व प्रतिसरकार काही : पूर्वस्मृती.' पृष्ठ २५७) महात्माजींनी नाना पाटलांना दिलेले वरील उत्तर एवढे समर्पक व अर्थपूर्ण आहे की, त्यावर वेगळी टीका-टिपणी करण्याची काही आवश्यकता नाही. सत्य-अहिंसेचा पोकळ आणि शुष्क काथ्याकूट करीत प्रतिसरकारच्या आंदोलनाला नाके मुरडणाऱ्या महाभागांना वेगळे उत्तर देण्याचीही आवश्यकता नाही.

□ □



# नाना पाटील नाही एकला

सातारा जिल्ह्यात भूमिगतांचे जीवन खडतर होते. पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी त्यांना एकसारख्या रहावयाच्या जागा बदलाव्या लागत. सैन्य पाठीवर घेऊन पुढे पळणाऱ्या दुसऱ्या बाजीरावासारखीच त्यांची अवस्था होती. फरक इतकाच की, दुसरा बाजीराव इंग्रजांबरोबर लढाई टाळण्यासाठी व जीव बचावण्यासाठी पळत होता आणि प्रतिसरकारचे क्रांतिकारक नेते इंग्रजांच्या विरुद्धची जनतेची लढाई अधिक तीव्र करण्यासाठी गनिमी काव्याचा अवलंब करून पोलिसांना झुकांड्या देत होते. हा गुणात्मक फरक अर्थातच फार मोठा आहे. ते जीव वाचविण्यासाठी पळत नव्हते. त्यांना जिवाची तमा नव्हती. बचेंगे तो और भी लढेंगे अशी त्यांची धारणा होती, म्हणून अटक टाळण्यासाठी ते पोलिसांना झुकांड्या देत होते.

सातारा जिल्ह्याच्या दक्षिण आणि उत्तर भागातही क्रांतिकारकांना उत्स्फूर्त सहाय्य जनतेकडून मिळत होते. विशेषतः ग्रामीण भागातील लोक या बाबतीत अधिक सक्रीय होते. क्रांतिकारकांची वागणूक व वर्तन सर्वसाधारणपणें चोख होते. क्वचितच एखाद दुसरा अपवाद निर्माण झाला असेल. खेड्यापाड्यातले शेतकरी भूमिगतांना मोठ्या शिताफीने आपल्या घरात दडवून ठेवीत. वेळ प्रसंगी फरारी नेता आपला जावई, मेहुणा असल्याची बतावणी करीत. तसे करताना घरातल्या अशिक्षित भोळ्या भाबड्या स्त्रियांना या बनवाबनवीत सामील करून घेत व त्याही निःशंक मनाने त्यात सहभागी होत असत. प्रतिसरकारचे प्रमुख नेते साताऱ्यापासून कोल्हापूरपर्यंत उभा–आडवा, पूर्वेपासून पश्चिमेकडे आणि उत्तरेपासून दक्षिणेपर्यंतच्या मुलखात एखाद्या झंजावातासारखा संचार करीत. नाना पाटलांचा मुक्काम बहुशः कुंडलला क्रांतिकारकांच्या संरक्षित गुहेत असे. त्यांचे सहकारी आणि अनुयायी जिल्हाभर वादळासारखे भिरभिरत असत.

नाना पाटील यांच्या सारखा पूर्वप्रसिद्धी लाभलेला नेता वगळता बेचाळीसच्या लढ्यातलें सातारा जिह्यातले नेते बहुशः तरुण व राजकीय लढ्यात प्रथमच पदार्पण करणारे होते. त्यामुळे पोलीस खात्याला ते नवखे होते. त्यांचे रेकॉर्ड तोपर्यंत पोलिसांच्या दफ्तरी तयार झाले नव्हते. पोलीस त्यांना प्रत्यक्ष ओळखीत नव्हते त्यामुळे भूमिगत असताना पुष्कळ वेळा पोलीसांच्या समोरून ते साखसूरत निसटून जात. ते निसटून गेल्यानंतर आपल्या पुढून कोण गेले याचा सुगावा पोलीसांना लागे. हळहळणे आणि हात चोळीत बसण्याशिवाय पोलीसांना काही करता येत नसे. नागनाथ नायकवडी नाना पाटलांचे एक प्रमुख सहकारी. आंदोलनाच्या

काळातही त्यांचा मुक्त संचार चालू होता. त्यांच्या अटकेसाठी सरकारने बक्षिस जाहीर केले होते. नाना पाटलांप्रमाणे ते अखेर पर्यंत पोलीसांना सापडले नाहीत. मिळेल ती भाकरी चटणी खाऊन ते कधी एखाद्या शेतकऱ्याच्या झोपडीत, कधी शेतावरच्या बांधावर झाडाखाली वस्ती करीत. पांडू मास्तर येरवड्याच्या तुरुंगाच्या तटबंदीवरून उडी मारून बाहेर आले आणि सातारा जिल्ह्यात येऊन पुनश्च हरिः ओम् म्हणत त्यांनी कामाला सुरुवात केली. वाळवे तालुका–शिराळा पेटा भागांत त्यांचा मुक्त संचार होता. ते भूमिगत होते खरे, पण ते ब्रिटिश सरकारच्या पोलिस खात्या पुरते.

पुणे–मुंबईसारख्या शहरात भूमिगत क्रांतिकारकांना जसे हालात दिवस काढावे लागले, तसे सातारा जिल्ह्यात घडले नाही. कारण भूमिगत कार्यकर्ते आणि त्यांचे कार्य याच्याशी ग्रामीण भागातली जनता समरस झाली होती. भूमिगत कार्यकर्त्यांना सहाय्य करून स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान निदान त्या पद्धतीने तरी करावे असे त्या लोकांना मनापासून वाटत होते. भूमिगतांना सहाय्य करून, ब्रिटिश सरकारविरुद्ध चालविलेल्या सशस्त्र लढ्यात आपण सहभागी होत आहोत अशी त्यांची भावना होती. तसे करण्यात, त्यांना कर्तव्यपूर्तीचे समाधान मिळत होते.

यशवंतराव चव्हाण भूमिगत असताना कऱ्हाड आणि वाळवे तालुक्यातल्या खेडेगावात रहात होते. त्यांची व्यवस्था एखाद्या शेतकऱ्याच्या घरी, पाटलाच्या वाड्यातल्या माळ्यावर किंवा गावातल्या एखाद्या बुजुर्गाच्या घरी केली जात असे. कार्यकर्ते सावधपणाने येऊन त्यांना भेटत, सल्ला मसलत करून निघून जात. गावाचा गाव कामगार, पोलीस पाटील किंवा जवळपासचे

पोलीसांचे "गॅट" येथे यशवंतरावांच्या वास्तव्याची खबर जाणार नाही एवढी काळजी घेतली म्हणजे पुरत असे. इतके करूनहीं पोलीसांना खबर मिळाली तर, त्यांची हालचाल होण्यापूर्वीच ग्रामस्थ हालचाल करीत व संरक्षण देऊन त्यांची दुसऱ्या गावी रवानगी करीत. स्वातंत्र्य सैनिकांच्या संदेश वाहकाची कामगिरी बजावणारे गुप्तहेर खाते बहुधा प्रत्येक गावात आणि खेड्यात होते. शाळकरी मुले आणि तरुण हे काम विश्वासाने, मोठ्या उत्साहाने करीत असत. प्रसंगी जीव धोक्यात घालूनही करीत. यशवंतराव चव्हाण यांनी "कृष्णा-काठ" या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडात लिहिले आहे, "ऑगस्टच्या महिन्यात चळवळ सुरू झाल्यावर आम्ही भूमिगत झालो व भूमिगतांचे जीवन जगू लागलो ते त्या काळच्या परिभाषेत ठीक आहे, परंतु खरे म्हणजे आम्ही फार मोकळेपणाने हिंडत होतो. लोकांची मने भारलेली होती. त्यामुळे भूमिगत राहाणे म्हणजे लपून छपून रहाणे असे त्याला स्वरूप नव्हते. भूमिगत कार्यकर्ते स्वतःच्या घरापासून, आप्तस्वकीयांपासून व ओळखी पाळखीच्या लोकांपासून दूर रहात होते एवढेच काय ते."

कृष्णाकाठ मध्ये यशवंतराव चव्हाण पुढे म्हणतात, "जे मिळेल ते वाहन वापरून प्रवास करावयाचा असा आमचा परिपाठ होता. कधीं बैलगाडी, कधी सायकल, तर कधी मोटार सायकल, कधी रेल्वेने, कधी पायी सुद्धा आमचा प्रवास चालत असे. (किसन-वीरांच्या वाई जवळच्या) कवठ्याला मी असाच सायकलवरून जाऊन पोहोचलो होतो. सातारा शहराची हद्द ओलांडीपर्यंत एका मित्राच्या मोटारीतून गेलो आणि तेथून पुढचा प्रवास सायकल वरून केला. कवठ्याला पोहोचल्यावर मी पहातो तो आबांनी

(किसनवीर) जाहीर सभाच बोलावून ठेवलेली . . . . . भूमिगत यशवंतराव आले आहेत अशी गावामध्ये हाळी दिली होती. कवठे व आसपासच्या गावांची मंडळी सभेसाठी जमली होती. मी निवांत पाऊण तास त्या सभेत बोललो आणि सभा संपविली. मग मात्र आबा म्हणू लागले, आता गावात थांबावयाचे नाही. मी बाहेर तुमची व्यवस्था केली आहे. त्यांना शंका होती की जाहीर सभेची बातमी कळताच तालुक्याचे ठाणेदार आपला फौजफाटा घेऊन तेथे येतील. ते त्या रात्री आले नाहीत, पण दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र आले. ती रात्र त्यांनी आम्हाला सवड दिली."

सातारा जिल्ह्यात भूमिगत क्रांतिकारकांचे चार वेगवेगळे गट चार भागात कार्य करीत होते. प्रत्यक्ष नाना पाटील यांच्या भोंवती असलेला कुंडल गट सर्वांत सुसंघटीत आणि बलवान् होता. या गटाची ताकद जी. डी. लाडांच्या नियंत्रणाखाली असलेल्या तुफान सभेत जशी होती, तशीच औंध संस्थानिधिपती-कडून मिळत असलेल्या प्रच्छन्न सहाय्यात होती. अप्पासाहेब पंतांच्या कडून त्यांना किती सहाय्य मिळाले असे विचारण्यापेक्षा कोणते म्हणून सहाय्य मिळाले नाही असा प्रश्न विचारणे अधिक उचित होईल ! प्रति सरकारच्या नेत्यांना तुमच्या संस्थानातून मिळत असलेल्या सहाय्याचा बंदोबस्त करा, असा लकडा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी अप्पासाहेब पंतांच्या मागे लावला तेव्हा त्यांनी कुंडल ग्रुपच्या श्रेष्ठींची भेट घेतली. अशी भेट घेणे आता पूर्वी-सारखे सोपे राहिले नव्हते. भूमिगतांबरोबर अप्पासाहेबांचे जिव्हाळचाचे लागेबांधे जुळले आहेत अशी ब्रिटिश अधिकाऱ्यांची खात्री पटली होती व त्यांनी औंध संस्थानच्या पंतप्रधानांच्या हालचालीवर सक्त नजर ठेवली होती. अप्पासाहेब संस्थानची हद्द

ओलांडून थोड्या अंतरावर असलेल्या एका गावी गेले. बरोबर पत्नी सौ. नलिनी पंत होत्या. त्या डॉक्टर आहेत. अगोदरच ठरविलेल्या संकेता प्रमाणे डॉ. मिसेस् पंतांना बोलावण्यासाठी कांही खेडूत आले. त्यांच्या घरी बाळंतीण अडली होती व तिची सुटका करण्यासाठी चलाच अशी गळ डॉ. पंतांना ते घालीत होते. सौ. पंतांचे कोमल हृदय द्रवले व अडलेल्या बाईची सुटका करण्यासाठी डॉक्टरी उपकरणांची बॅग घेऊन त्या निघाल्या. वेळ रात्रीची होती. म्हणून अप्पासाहेबही त्यांच्या बरोबर सोबतीसाठी निघाले. जवळच असलेल्या खेड्यावर ते पोहोचले. सौ. पंत बाळंतणीच्या खोलीत गेल्या व अप्पासाहेब पंत गुपचुपणे संकेत स्थळाकडे निघून गेले. प्रमुख भूमिगत कार्यकर्त्यांची तेथे बैठक झाली. आप्पासाहेबांनी त्यांना सर्व परिस्थिती समजावून सांगितली. अपल्यावर ब्रिटिश सरकारचे दडपण कसे वाढत आहे ते सांगितले. शेवटी तोडगा काढण्यात आला. काही छोटे छोटे कार्यकर्ते भूमिगतांनी औंध संस्थानच्या हद्दीत पाठवावेत. त्यांना संस्थानच्या पोलिसांनी अटक करावी व जेल मध्ये डांबावे. मोठ्या व महत्त्वाच्या भूमिगतांनी काही दिवस औंध पासून दूर रहावे असे ठरले. त्या प्रमाणे कार-वाई करण्यात आली. औंध संस्थानात काही भूमीगतांना अटक झाली व एका अवघड पेंचातून औंधच्या पंत प्रधानांची सुटका झाली.

सातारा जिल्ह्यातल्या अन्य तीन गटांच्या भूमिगत कार्यकर्त्यांना औंधच्या राजा सारखा साहाय्यकर्ता लाभला नाही, परंतु ती उणीव त्या भागातल्या जनतेने भरून काढली. अंतू काका वर्डे, पांडू मास्तर, बाबूजी पाटणकर, शिराळा पेटा व सातारा जिल्ह्याचा पश्चिम भाग या क्षेत्रात धडाडीने काम करीत होते, प्रतिसरकारची

राजवट राबवीत होते. त्यांच्या अटकेसाठी वॉरंटें होती. शिकारी कुत्र्यासारखा पोलीस त्यांचा पाठलाग करीत होते. पोलिसांना त्यांच्या अस्तित्वाचा वास येत होता, पण ते त्यांना सापडत मात्र नव्हते. कधी त्या भागातले खेडूत त्यांना गुपचुपणे एका गावातून दुसऱ्या गावात नेऊत सोडीत होते तर कधी खांद्याला अडकवलेल्या रायफलचा उपयोग करून पोलिसांच्या डोळ्यादेखत ते निसटून जात होते. दहा दहा, पंधरा पंधरा मैल सायकली पिटाळून तरुण कार्यकर्ते पोलिसांचा छापा आल्याची वर्दी भूमिगतांना देत. कधी त्या ठिकाणी भूमिगतांची सभा भरलेली असे, केव्हा कार्यकर्त्यांची बैठक चालू असे. तथापि पोलिसांच्या हालचालींची खबर मिळताच, पाच मिनिटांच्या आत सगळे तिकडच्या तिकडे पांगून जात. पोलिसांचा छापा येई तेव्हा माणूसच काय पण भटके कुत्रे सुद्धा त्यांना तेथे आढळत नसे. जनतेचे असे उत्स्फूर्त सहाय्य सातारा जिल्ह्यात भूमिगतांना मिळाले. ते भूमिगत असतानाही आपल्या भागात उघडपणे वावरत होते. दोन वेळचे जेवण कसे मिळेल याची त्यांना कधी चिंता करावी लागली नाही. ज्या घराच्या दारावर ते थाप मारत, त्या घरात त्यांचे स्वागत होत असे. अगदी मनापासून होत असे. साधूसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा अशा उत्कट भावनेने लोक त्यांची सरबराई करीत. त्यांच्या भोजनाची व्यवस्था करीत आणि निवासाचीही करीत. पण हे या कानाचे त्या कानाला कळत नसे. लोकांना कोणी कसले खास शिक्षण दिले नव्हते. शिस्तीच्या संथा दिल्या नव्हत्या. त्यांच्यावर कसली सक्तीही करण्यात येत नव्हती. भूक भागविण्यासाठी बंदूक रोखून भूमिगतांनी अन्न मिळविले असा प्रकार कोठेहि घडला नाही. तसे करण्याची काही आवश्यकता नव्हती. खेड्यातल्या

प्रत्येक चंद्रमौळी घराचे दार त्यांच्या साठी सदैव उघडे होते. घरातली गृहीणी आपल्या हातांनी शिजविलेले अन्न त्यांच्या मुखी पडावे म्हणून धडपडत होती. तसे ते घडले म्हणजे कृतकृत्य होत होती. तृप्त होऊन ते क्रांतिकारक निघाले म्हणजे कानावर बोटे मोडून इडा पिडा टळो म्हणून देवाला विनवीत होती आणि त्याला उद्देशून म्हणत होती, "जा बाबा, सुक्षेम रहा, स्वराज्य घेऊन ये, तुला मी निरांजनानं ओवाळीन."

मात्र हे आगळे भाग्य फक्त सातारा जिल्ह्यातल्या भूमिगतांनाच लाभले होते. बेचाळीसच्या लढ्याची प्रारंभीची उर्मी पहिल्या दोन तीन महिन्यानंतर हळूहळू ओसरू लागली. प्रतिसरकार स्थापन करण्याची कल्पना आकार घेत होती. परंतु ती अद्याप गर्भावस्थेत होती. भूमिगत कार्यकर्त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती पुढच्या कार्याची स्पष्ट रूपरेखा तयार नव्हती. तालुक्याच्या सरकारी कचेऱ्यांवर मोर्चे नेण्याचे पर्व संपले होते. त्या मोर्च्यांनी लोकजागृती करण्याचे काम झाले होते. तथापि त्यासाठी द्यावी लागलेली किंमत जबर होती! मोर्चावर गोळीबार करून पोलिसांनी पाखरांसारखे कार्यकर्ते टिपले होते. मोर्चा काढून कार्यकर्त्यांना हकनाक बळी देण्याची नेत्यांची तयारी नव्हती. त्यातले वैय्यर्थ त्यांना पटले होते. नवा मार्ग शोधण्यासाठी ते चिंतन करीत होते.

एवढ्या मोठ्या संख्येने भूमिगत कार्यकर्ते जमा झाले होते की त्यांची व्यवस्था करणे नेत्यांना अवघड झाले. त्यांच्याजवळ त्यांना देण्यासाठी कामही नव्हते. अखेरीस दुय्यम, तिय्यम दर्जाच्या कार्यकर्त्यांनी सत्याग्रह करून तुरुंगात जावे, काही जणांनी मुंबई जवळ करावी असा निर्णय करण्यात आला. बरेच कार्यकर्ते जेल-

मध्ये गेले. ज्यांना सत्याग्रह करून अटक करवून घेणे पसंत नव्हते त्यांची मुंबईला रवानगी करण्यात आली. मुंबईचे गिरणगाव भूमिगतांचे मायपोट होते. मुंबईच्या कापड गिरण्यामध्ये महाराष्ट्रातले लाख, दीड लाख कामगार घाम गाळीत होते त्यांनी परळ भागातल्या चाळी चाळीतल्या एक दीड खोलीच्या आपल्या बिऱ्हाडात भूमिगतांची रहाण्याची व्यवस्था केली व आपल्या ताटातली अर्धी भाकरी त्यांना दिली. तसे करताना आपण आपले कर्तव्य करीत आहोत, त्या भमिगत कार्यकर्त्यांवर उपकार करीत नाही अशा भावनेने त्यांनी हे केले. पुढे साताऱ्यात प्रतिसरकार स्थापन झाले. कामाची झिम्मड उडाली. भूमिगतांना कामाचे डोंगर उपसावे लागू लागले. सराईत गुंडांचा बदोबस्त, विकेंद्रित लोकशाही राबविणे, न्याय निवाडयाची यंत्रणा सुरळीत चालेल याची दक्षता घेणे अशी कामेच कामे त्यांच्या पुढे वाढून ठेवली होती. भूमिगत कार्यकर्त्यांना आसरा निर्माण करणे मग फारसे कठीण गेले नाही. त्यांची दोन वेळची भूक अगदी सुलभपणे भागत होती. निवाऱ्याची सोयही होत होती. तेवढी गरज भागल्यावर त्यांना अधिक काही नको होते.

साताऱच्या प्रतिसरकारसाठी कार्यक्रमाचा आराखडा कोणी निर्माण केला होता ? बेचाळीसची चलेजाव चळवळ तीव्र व परिणामकारक करण्यासाठी स्पष्ट व काटेकोर योजना कोणी तयार केली होती ? जी योजना राबविण्याचे काम नाना पाटील व त्यांच्या निधड्या छातीच्या शूर अनुयायांनी केले, त्या योजनेची बीजे पुरविली होती गुजरातचे एक वयोवृद्ध, अनुभवी व कर्तबगार कॉंग्रेस नेते छोटूभाई पुराणी यांनी. बेचाळीसपूर्वीच त्यांनी गुजरात-मध्ये 'आखाडा' कार्यक्रम चालू केला होता. हजारो तरुणांना त्या

कार्यक्रमात सामील करून घेतले होते. बेचाळीसचा लढा तीव्र करण्याच्या कामातले त्यांचे मार्गदर्शन मोलाचे होते. हिटलरच्या टाचेखाली सापडलेल्या हॉलंड, डेन्मार्क, नॉर्वे, फ्रान्स आदि देशांत हिटलरशाहीला विरोध करून प्रतिकार करण्यासाठी जे साहित्य इंग्लंड–अमेरिकेतून त्या देशात पाठविले जात होते, विमानातून ठिकठिकाणी टाकण्यात येत होते, त्याच्या प्रती छोटू भाई पुराणी यांनी मिळविल्या व "ए. बी. सी. ऑफ सॅबोटाज" सारख्या पुस्तकाचे भाषांतर अनेक भारतीय भाषांत करून घेऊन देशभर वाटण्याची तजबीज केली. आंध्र–कर्नाटकापासून आसाम–बंगाल-पर्यंत ते साहित्य छोटूभाईंनी पुरविले. मुंबईच्या सेंट्रल डिरेक्टोरेट-कडे मध्यवर्ती नियंत्रण मंडळाकडे त्या प्रती आल्यावर त्यातल्या काही साताऱ्याला पाठविण्यात आल्या. नाना पाटलांचे प्रति-सरकारचे कार्य आणि संघटना सर्वसाधारणपणे छोटूभाई पुराणी यांच्या त्या पुस्तकात विषद करण्यात आलेल्या योजनेवर बेतली होती. गनिमी प्रतिकाराचे अनेक नवे नवे पर्याय छोटू भाईंच्या पुस्तकात साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या प्रमुखांना मिळाले. त्यांना नवी दिशा मिळाली.

अशा या प्रतिसरकारचे प्रमुख होते नाना पाटील. क्रांतीचे शाहीर निकम प्रतिसरकारने स्वतंत्र केलेल्या साताऱ्याच्या खेडो-पाडी डफावर थाप मारून सांगत होते;

नाना पाटील नाही एकला।
त्याच्या दिमतीला आज उभा केला।
मर्दाचा सारा सातारा प्रांत।
पोलादी संघटना लोकात।
शेकड्यांनी शस्त्र सिद्धी हातात।

भूमिगत क्रांतिकारकांना, तुफान सेनेच्या सैनिकांना नाना पाटलांनी आदेश दिला होता,

'सत्यासाठी' सुखे लुटावा सत्तेचा पैसा ।
शिवरायांनी घालून दिधला धडाच हा ऐसा ।

ब्रिटिश सरकारच्या पोलिसांना आणि सशस्त्र सैनिकांना धूळ चारणारे नाना पाटील एकटे नव्हते. तुफान सेना त्यांच्या मागे उभी होती. सातारा जिल्ह्यातले तरुण व खेड्या पाड्यातले शेतकरी त्यांचा शब्द झेलत होते. अशिक्षित मराठमोळ्या स्त्रिया हातात आरतीचे तबक घेऊन नाना पाटलांना व त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांना ओवाळण्यासाठी घरा घराच्या, झोपडी झोपडीच्या उंबरठ्यावर आतुरतेने उभ्या होत्या. साताऱ्याच्या प्रतिसरकारची खरी ताकद ही होती. ती ताकद निर्माण झाली म्हणूनच भूमिगत क्रांतिकारक सातारा जिल्ह्याच्या दक्षिण आणि उत्तर भागात आत्मविश्वासाने वावरू शकले. चौदा महिने त्यांनी प्रतिसरकार चालविले. विकेंद्रित लोकशाहीचा–ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी केला. सातारा जिल्ह्यातले प्रतिसरकार म्हणजे देशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातले एक सोन्याचे पान. धोंडोपंत ऊर्फ नाना साहेब पेशवा, वासुदेव बळवंत फडके यांच्या नंतर नाना पाटील व त्यांचे प्रतिसरकार यांचाच महाराष्ट्रात क्रम लागतो त्यांच्यात सरस निरस ठरविता येणार नाही. तसा प्रयत्न करणे म्हणजे अस्सल सोन्याच्या तीन लगडीतला फरक धुंडाळण्यासारखे आहे.

BVBK-0402075

क्रांतिसिंह नाना पाटलांचे